POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-२८२ ● मुंबई, बुधवार, १४ मे २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## पीएम मोदींची आदमपूर एअरबेसला 'सर्जिकल' भेट

### पाकिस्तानचा 'एअरबेस' ड्रामा फेल!







**■जालंधर । प्रतिनिधी :**

'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर अवघ्या दोन दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जालंधरमधील आदमपूर एअरबेसला अचानक भेट देऊन पाकिस्तानच्या खोट्या दाव्याला थेट उत्तर दिलं आहे. पाकिस्तानने १२ मे रोजी या एअरबेसवर हल्ला करून तो नष्ट केल्याचा दावा केला होता. मात्र, १३ मे रोजी मोदींनी स्वतः तिथे पोहोचून हे सर्व थोतांड असल्याचं सिद्ध केलं.

पंतप्रधानांच्या भेटीदरम्यान त्यांच्या मागे दिसणारे 'मिग-२९ लढाऊ विमान' आणि 'एस-४०० 'सुदर्शन चक्र' हवाई संरक्षण प्रणाली' हे भारताच्या अचल सामर्थ्याचं प्रतीक ठरले. या दृश्यांनी केवळ पाकिस्तानच्या खोट्या प्रचाराला धक्का बसला नाही, तर संपूर्ण जगासमोर भारताचं संरक्षणक्षेत्र किती सक्षम आहे, हे अधोरेखित झालं.

**पाकिस्तानचा आदमपूर एअरबेस नष्ट केल्याचा दावा**

'ऑपरेशन सिंदूर'नंतर पाकिस्तानने आदमपूर एअरबेसवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे हल्ला केला होता. मात्र, एस-४०० प्रणालीने हा हल्ला निष्फळ ठरवला. यानंतर पाकिस्तानने बनावट उपग्रह छायाचित्रे व व्हिडिओ व्हायरल करत भारताचं नुकसान झाल्याचा खोटा प्रचार सुरु केला.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी काय म्हणाले**

"ते भित्र्यासारखे लपून आले पण ते विसरले की ज्याला त्यांनी आव्हान दिले होते ते भारतीय सैन्य होते. तुम्ही समोरून हल्ला करून त्यांना ठार मारले. तुम्ही सर्व दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. ९ अड्डे उद्ध्वस्त झाले आणि १०० हून अधिक दहशतवादी मारले गेले. दहशतीच्या सूत्रधारांना आता समजले आहे की भारताकडे डोळेझाक करण्याचा एकच परिणाम होईल आणि तो म्हणजे विनाश."

"दहशतवादाविरुद्ध भारताची लक्ष्मणरेषा आता अगदी स्पष्ट आहे. जर पुन्हा दहशतवादी हल्ला झाला तर भारत त्याला प्रत्युत्तर देईल, जोरदार प्रत्युत्तर देईल... आता 'ऑपरेशन सिंदूर' हे भारताचे 'न्यू नॉर्मल' ठरलं आहे..."

ञ्जजेव्हा आमच्या माता-भगिणींच्या माथ्यावरचे कुंकू हिसकावून घेतले गेले, तेव्हा आम्ही दहशतवाद्यांच्या घरात घुसून प्रतिकार केला."

पण, पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्यामुळे पाकिस्तानचा हा डाव उधळून लावण्यात आला. त्यांनी सैनिकांशी संवाद साधत त्यांचं मनोबल उंचावलं, तसेच ञ्जभारत माता की जयञ्ज आणि ञ्जवंदे मातरमञ्जच्या घोषणांनी वातावरण भारावून टाकलं. तसेच पंतप्रधान मोदी यांनी म्हंट्लं कि घोषणा केवळ उत्साह नव्हे, तर शेजारच्या देशाला एक स्पष्ट इशारा आहे, कि भारत आपल्या लष्कराच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. या भेटीद्वारे मोदी यांनी जगासमोर आपली सामरिक ताकद, तत्परता आणि देशभक्ती यांचा ठळक संदेशही दिला आहे.

## देशात लवकरच बॉम्बस्फोट होणार?

### धमकीच्या मेलने खळबळ



**मेल कोणी केला, कसून घेतला जातोय शोध**

दरम्यान, याआधीही मुंबई शहरासह देशांच्या इतर भागात धमकीचे मेल आलेले आहेत. यावेळीही धमकीचा मेल आला असून त्याला प्रशासनाने गांभीयार्ने घेतलं आहे. हा मेल नेमका कोणी पाठवला? याचा कसून शोध घेतला जात आहे.

**■मुंबई । प्रतिनिधी :**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या वाद चालू आहे. पहलगाम हल्ल्यानंतरहा वाद जास्तच वाढलाय. सध्या मात्र दोन्ही देशांत शस्त्रसंधी झाली आहे. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच देशाला संबोधित करत पाकिस्तानला चांगलेच खडसावले आहे. आम्ही दहशतवादी आणि दहशतवादाला पाठिंबा देणारे सरकार यांना वेगळे मानत नाही, असे मोदी यांनी स्पष्ट केले आहे. असे असतानाच आता देशात लवकरच बॉम्बस्फोट होणार असा धमकीचा मेल आहे. या धमकीच्या मेलमुळे देशात खळबळ उडाली आहे.

**मेलमध्ये नेमकं काय आहे?**

मिळालेल्या माहितीनुसार देशात लवकरच बॉम्ब ब्लास्ट होणार असल्याचा धमकीचा मेल आला आहे. तशी माहिती महाराष्ट्र पोलीस नियंत्रण कक्षाकडून मुंबई पोलिसांना देण्यात आली आहे. या माहितीनंतर मुंबई पोलीस सतर्क झाले आहेत. सोबतच मुंबई पोलिसांकडून सर्व प्रकारची खबरदारी घेण्यात येत आहे.

**सोमवार ते बुधवार या काळात होणार बॉम्बस्फोट?**

आपत्ती व्यवस्थापनाच्या कंट्रोल रुमला हा धमकीचा मेल आला आहे. याच मेलच्या अनुषंगाने सोमवार ते बुधवार या काळात सतर्क राहण्याचा इशारा देण्यात आला आहे. धमकीच्या मेलमुळे सगळीकडे सध्या खळबळ उडाली आहे. सध्या भारत आणि पाकिस्तान यांच्यात सध्या तणावाची स्थिती आहे. असे असतानाच हा मेल आल्यामुळे सर्व यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. कोणतीही चूक होऊ नये यासाठी खबरदारी घेतली जात आहे.

**मोदींनी पाकिस्तानला खडसावलं?**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वाद सध्या थोडा शमला आहे. पण मोदी यांनी १२ मे रोजी देशाला संबोधित करत पाकिस्तानला चांगलेच खडसावले आहे. टेटर आणि ट्रेड एकत्र चालू शकत नाही. रक्त आणि पाणी सोबत वाहू शकत नाहीत, असं म्हणत मोदी यांनी आम्ही यापुढे दहशतवादी हल्ले खपवून घेणार नाही, असं थेट सांगून टाकलं आहे.

## भारत वि.पाकिस्तान युद्धाचा परिणाम

### देशाची राजधानी नागपूरला हलवण्याची मागणी... दिली कारणांची यादी

**■रायगड । प्रतिनिधी :**

भारत-पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण स्थितीच्या पार्श्वभूमीवर देशाची राजधानी नागपूरला हलवण्याची मागणी करण्यात आली आहे. भौगोलिकदृष्ट्या दिल्ली पाकिस्तानसारख्या शत्रू राष्ट्रांच्याजवळ असल्याने नागपूरला राजधानी करण्याची मागणी करण्यात आली आहे. दिल्लीला हल्ल्याचा धोका होऊ शकतो. दिल्ली देशाची राजधानी आहे आणि या शहरामध्ये सर्वात महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांची आणि धोरणात्मक कक्ष आहेत. पाकिस्तानकडून होणाऱ्या युद्धाच्या किंवा लष्करी आक्रमणांच्या धोका लक्षात घेता देशाची राजधानी नागपूरला हलविण्याची मागणी एका माजी खासदाराने केली.

**दिल्लीआधी हे शहर होतं राजधानी**

दिल्लीला राजधानी घोषीत करण्याआधी ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या काळात भारताच्या पूर्वेकडे असलेलं कोलकाता (कलकत्ता) शहर भारताची राजधानी होती. मात्र, प्रशासनात सुलभता, दिल्लीचे भौगोलिक स्थान आणि ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन १२ डिसेंबर १९११ रोजी किंग जॉर्ज पंचम यांच्या उपस्थितीत दिल्लीला देशाची नवी राजधानी म्हणून जाहीर करण्यात आलं. त्यानंतर नवी दिल्लीचे नियोजन आणि बांधकाम प्रसिद्ध वास्तुविशारद एडविन ल्युटियन्स आणि हर्बर्ट बेकर यांनी केले. १९३१ साली नवी दिल्ली अधिकृतपणे राजधानी म्हणून कार्यान्वित झाली. मात्र आता भौगोलिकदृष्ट्या पाकिस्तानसारख्या शत्रू राष्ट्रांच्याजवळ असल्याने नागपूरला राजधानी करण्याची मागणी करण्यात आली आहे.



**यापूर्वीही झाली नागपूरला भारताची राजधानी करण्याची मागणी**

नागपूरला भारताची राजधानी बनवण्याचा विचार यापूर्वीही काही वेळा करण्यात आला आहे. 1930 च्या दशकात ब्रिटिश राजवटीच्या काळात, भारतात अनेक ठिकाणी राजधानी बदलण्यावर चर्चा झाली होती. नागपूरच्या भौगोलिक स्थानामुळे आणि मध्य भारतात स्थित असल्यामुळे, त्याला राजधानी बनवण्याचा विचार काही काळ केला गेला. यानंतर १९५० च्या दशकात याबाबत पुन्हा चर्चा झाली. भारत स्वतंत्र झाल्यानंतर, विशेषतः १९५० च्या दशकात, नागपूरला राजधानी बनवण्याचा विचार झाला. दिल्ली जास्त पूर्वेतील भागात स्थित आहे आणि भारतीय राज्यसंस्थेची सर्व प्रमुख कार्यालये तसेच संसद दिल्लीमध्ये होते. काही लोकांना मध्य भारतातील नागपूर अधिक योग्य ठिकाण वाटत होते. यामुळे एकूणच नागपूरच्या संभाव्यतेवर चर्चा होती, परंतु या विचाराला तांत्रिक, राजकीय आणि इन्फ्रास्ट्रक्चरल आव्हानांचा सामना करावा लागला आणि हा विचार मागे पडला. मात्र आता भारत-पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा या मागणीनं डोकं वर काढलं आहे.

**कुणी केली मागणी?**

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूरचा विचार देशाची राजधानी म्हणून करावा, अशी मागणी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री खासदार विलास मुत्तेमवार यांनी केली आहे. राजधानी दिल्लीला असलेला संभाव्य धोका लक्षात घेता, आपत्कालीन पयार्यी म्हणून नागपूरचा विचार करता येईल असं मुत्तेमवार यांनी म्हटलं आहे. "यासंदर्भात मी लोकसभेत अनेक वेळा ही मागणी केली. आज भारत पाकिस्तान तणावाच्या स्थितीतही माझी हीच मागणी आहे," असं मुत्तेमवार म्हणाले. "२००१ आणि २०१३ मध्ये मी संसदेत ही मागणी केली आणि नंतर एक महिन्यातच संसद-वर हल्ला झाला. तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्याकडे ही मागणी केली होती," असंही मुत्तेमवार यांनी सांगितलं.

## कृत्रिम वाळू धोरणाबाबत मोठा निर्णय

### मंत्रिमंडळाने दिली मंजुरी, काय होणार फायदा



**■मुंबई । प्रतिनिधी :**

राज्य मंत्रिमंडळाच्या कॅबिनेटची आज बैठक झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ही बैठक झाली. या बैठकीत कृत्रिम वाळू धोरणाविषयी मोठा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पर्यावरण नुकसान टळणार आहे. तर वाळूच्या माध्यमातून ग्रामीण भागात पसरलेल्या गुंडगिरी आणि वाळू माफियाना मोठा दणका बसला आहे. रस्त्यावर राहणाऱ्या अथवा भटकंती करणाऱ्या बालकांच्या सर्वांगिण विकासासाठी पण धोरण आखण्यात आले. राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरणास मंजुरी देण्यात आली आहे. राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत करण्यात आला आहे. इतर ही काही धडाडीचे निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतले आहे.

**हे आहेत मंत्रिमंडळ निर्णय**

- रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी राज्यात फिरते पथक योजनेस मान्यता. २९ महापालिका क्षेत्रात पहिल्या टप्प्यात ३१ मोबाईल व्हॅन, यासाठी सुमारे ८ कोटी मंजूर करण्यात आले आहेत. (महिला व बालविकास विभाग)
- नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पबाधितांना ञ्जहोम स्वीट होमञ्ज अंतर्गत वाटप केलेल्या घरांच्या भाडेपट्ट्याच्या दस्तऐवजास मुद्रांक शुल्क कमी करुन केवळ एक हजार रुपये आकारणार आहे. (महसूल विभाग )
- कृत्रिम वाळू (एम-सँड) धोरणास मंजुरी ञ्ज प्रत्येक जिल्ह्यात ५० व्यक्ती/संस्थांना एम-सँड युनिट स्थापन करण्यासाठी उद्योगविभाग सवलती देणार, एम-सँड तयार करणाया युनिटला २०० रुपये प्रतिब्रास इतकी सवलत देणार. पर्यावरणाची हानी टळणार आहे. (महसूल विभाग)
- राज्य वेतनत्रुटी निवारण समितीचा अहवाल स्वीकृत. ८० कोटींचा भार राज्य सरकार स्वीकारणार आहे. (वित्त विभाग)
- राज्यातील शासकीय आयटीआयचे सार्वजनिक-खाजगी भागिदारीतून अद्ययावतीकरण धोरण ञ्ज आयटीआयला जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण केंद्रात रुपांतरित करणे हा मुख्य हेतू, उद्योग आणि आयटीआयच्या समन्वयातून रोजगारक्षमता वाढणार, प्रॅक्टिकल लर्निंग आणि अप्लाईड लर्निंगचे उद्देश साध्य होणार आहे. (कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग)
- राष्ट्रीय न्यायवैद्यक शास्त्र विद्यापीठाच्या महाराष्ट्रातील उपकेंद्रासाठी चिंचोली (ता. कामठी) जिल्हा नागपूर येथील २०.३३ हेक्टर आर जागा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. (महसूल विभाग)

## देवदर्शनाहून गावी परताना अपघात, कुटुंबातील तिघांचा मृत्यू

**■नांदेड । प्रतिनिधी :**

राज्यात गेल्या काही दिवसांत अपघाताच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं दिसून येत आहे. राज्य आणि राष्ट्रीय महामार्गावर अपघाताच्या भीषण घटना घडत असून वाहनांची गती आणि रस्ते, ओव्हरटेक हीच अपघाताची प्रमुख कारणे असल्याचे पाहायला मिळत आहे.

आजचा मंगळवार हा अपघातवार ठरला असून दिवसभरात अपघाताच्या तीन मोठ्या घटना घडल्या असून तीन अपघातात एकूण ९ जण ठार झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. बुलढाणा, चंद्रपूर आणि नांदेड जिल्ह्यातील ह्या घटना असून प्रत्येक अपघातात तीन जण ठार झाले आहेत. बुलढाण्यात पहाटेच्या सुमारास अपघाताची घटना घडली. तर, चंद्रपुरातही सायंकाळच्या सुमारास अपघात घडला. पिकअप आणि ट्रकच्या अपघातात तिघे ठार झाले आहेत. आता, नांदेड जिल्ह्यातील लोकरवाडी येथील एकाच कुटुंबातील तिघांचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

नांदेडच्या माहूर तालुक्यातील लोकरवाडी येथील तिघांचा अपघाती मृत्यू झाला आहे. लोकरवाडी गावातील पवार कुंटुबीय मध्यप्रदेश येथील उज्जैन शिऊर येथे देवदर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून ते परतीच्या प्रवासाला असताना अकोला खामगांव दरम्यान पवार यांच्या गाडीला अपघात झाल्याची माहिती आहे. या भीषण अपघातात देवराव पवार, बेबीताई पवार, निकेतन पवार या तिघांचा मृत्यू झाला आहे. तर, कारचालक संतोष कदम व अन्य दोन गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. या घटनेने माहूर तालुक्यावर शोककळा पसरली असून लोकरवाडी गावातील हळहळ व्यक्त होत आहे.





**नांदुराजवळ पहाटे अपघात**

बुलढाण्यातील नांदुरा शहरात मंगळवारी आज पहाटे एक भीषण अपघात झाल्याची घटना समोर आली आहे. या अपघातामध्ये तिघांचा जागीच मृत्यू झाला असून चार जण जखमी आहेत. जखमींपैकी अनेकांची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. प्राथमिक माहितीनुसार, बुलढाण्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वर हा अपघात घडला. पहाटे साडेचार वाजता नांदुरा शहराजवळ आर्टिगा कार आणि ट्रकची जोरदार टक्कर झाली. ही टक्कर इतकी जोरदार होती की, कारमधील तिघांचा जागीच मृत्यू झाला.

**चंद्रपुरातही अपघात, तिघांचा मृत्यू**

चंद्रपूर शहरातून प्रवासी वाहतूक करणाऱ्या काळी पिवळी टाटा मॅजिक वाहनाला ट्रकची धडक बसल्याने भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात टाटा मॅजिकच्या ड्रायव्हरसह ३ जणांचा मृत्यू झाला असून १४ प्रवासी जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती कळताच स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत चंद्रपूर प्रशासन व स्थानिकांच्या मदतीने बचावकार्य सुरू केले. अपघातातील जखमींना जवळील रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आल्याची माहिती देण्यात आली. या अपघातात निर्दोष मोहूर्ले (ड्रायव्हर), मनाबाई सिडाम (६५) आणि एक प्रवासी असे एकूण तिघे मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

## आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्यांची सुरक्षा पोलिस कमिशनर, सुरक्षेचा आढावा करणार

### राज्य सरकारचा मोठा निर्णय

**शासनाचे आदेश काय?**

- आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षेची गरज असेल तर त्यांना तात्काळ सुरक्षा पुरविण्यात यावी.
- काही काळ त्यांना राहण्यासाठी सुरक्षागृह ही प्रत्येक जिल्ह्यात तयार करण्यात यावीत.
- शासकीय विश्रामगृह असेल तर त्या ठिकाणी व्यवस्था करावी.
- जर शासकीय विश्रामगृह नसेल तर भाडेतत्त्वावरती घर खरेदी करून त्यांची व्यवस्था करण्यात यावी.
- या जोडप्यांच्या सुरक्षेचा प्रश्न असेल तर एफआयआर नोंदवून तात्काळ सुरक्षा पुरवली जावी.
- या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्यस्तरीय ११२ नंबरची हेल्पलाइन असणार.
- या कक्षाच्या संदर्भात दर तीन महिन्यांनी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यासंदर्भात आढावा घेऊन अहवाल तयार करतील.

**■मुंबई । प्रतिनिधी :**

आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांची सुरक्षा आता स्वतः पोलिस आयुक्त करणार आहेत. आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांचे अनुदान बंद केल्याची चर्चा सुरू असताना सुरक्षेचा महत्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांसाठी राज्य सरकारने हा मोठा निर्णय घेतला आहे.





**सुरक्षेसाठी विशेष समिती गठीत**

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा देण्यासंदर्भात विशेष कक्ष गठीत करण्यात आला आहे. पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्य कक्ष गठीत करण्यात आला आहे. या कक्षाचे प्रमुख पोलिस आयुक्त किंवा पोलिस अधीक्षक राहतील. सोबत जिल्ह्याचे समाज कल्याण अधिकारी आणि महिला बालविकास विभागाचे अधिकारी सदस्य असतील. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त अशा जोडप्यांच्या सुरक्षेचा आढ-ावा दर तीन महिन्यांनी घेणार आहेत.

## "फोन टॅपिंग होत असल्याने राज्यातील अधिकारी फोन उचलत नाही..."

### राष्ट्रवादी शरद पवार गटातील बड्या नेत्याचा आरोप

**■मुंबई । प्रतिनिधी :**

राज्यात फोन टॅपिंगचा विषय पुन्हा चर्चेत येणार असल्याचे चिन्ह दिसत आहे. राज्यातील अधिकाऱ्यांच्या फोन टॅपिंगच्या घटना घडत असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार एकनाथ खडसे यांनी केला. फोन टॅपिंगच्या प्रकारामुळे अर्ध्या महाराष्ट्रातल्या अधिकारी हे व्हाईस कॉलवर असतात. सचिव, अधिकारी अथवा पोलीस अधिकारी असो कॉल केल्यावर फोन उचलत नाही, या शब्दात एकनाथ खडसे यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

एकनाथ खडसे यांनी म्हटले की, पोलीस अधिकारी असतील, तहसीलदार असो किंवा इतर उच्च अधिकारी यांना फोन केला की ते फोन घेत नाहीत. त्यांचे परत उत्तर सुद्धा येत नाही. अनेक अधिकाऱ्यांना फोन केल्यावर मी व्हिसीमध्ये आहे. बैठकीमध्ये आहे, असे सांगितले जाते. मात्र दिवसभर बैठका चालतात का? असा सवाल एकनाथ खडसे यांनी उपस्थित केला आहे.



लाडक्या बहिणींना २१०० रुपये देऊ, अशी घोषणा सरकारने केली. मात्र, अजितदादा आता म्हणतात, अशी घोषणा कोणी केली, त्यावर बोलताना एकनाथ खडसे म्हणाले, सरकार आपल्या शब्दापासून मागे जात आहे. २१०० रुपये तर लांब राहिले १५०० रुपये सुद्धा वेळेवर मिळत नाही. राज्य दिवाळखोरीवर आले आहे. कर्जबाजारी झाले आहे. ४६ हजार कोटी रुपये लाडक्या बहिणी योजनेसाठी लागतात. त्याचा परिणाम इतर योजनांवर झाला आहे. राजीव गांधी योजना, गोपीनाथ मुंडे कृषी योजनेचे पैसे सहा महिन्यांपासून मिळत नाही. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही. त्यामुळे सरकारची दिवाळखोरी समोर आली आहे, असे एकनाथ खडसे यानी म्हटले आहे.

कर्ज काढायचे आणि लाडक्या बहिणींना पैसे द्यायचे, कर्ज काढून कर्मचाऱ्यांचे पगार करायचे, अशी आजच्या सरकारची परिस्थिती आहे, असे एकनाथ खडसे यांनी म्हटले. शरद पवार अजित पवार एकत्र येणार का? या प्रश्नावर खडसे म्हणाले की, गेला काय दिवसांपासून वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या निमित्ताने शरद पवार आणि अजित पवार एकत्र दिसत आहेत. त्यामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील, अशा चर्चा सुरू आहे. मात्र या चर्चांना कुठलाही अर्थ नाही. एकत्रीकरणाचा कुठलाही संकेत कार्यकर्त्यांपर्यंत पक्षाच्या माध्यमातून आलेला नाही.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## ट्रम्पांची मध्यस्थी कशापायी!

नेहमीच जागतिक पोलिसाच्या भूमिकेत वावरणाऱ्या अमेरिकेने आताही भारत-पाकिस्तान युद्धसदृश्य स्थितीत ऐनवेळी मध्यस्थीचा खोडसाळपणा केला, मात्र आम्ही संपूर्ण जगात होणाऱ्या हिंसेच्या विरोधात आहोत, आशियायी क्षेत्रात शांततेचे आमचे उद्दिष्ट असल्याचे ट्रम्प यांनी जगाला सांगण्याचा प्रयत्न केला. डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणाही परस्पर केल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. जगातील युद्धसदृश्य स्थितीत अमेरिकेने कायमच अशी जागतिक पोलिसाची भूमिका घेतली असताना त्यामागील राजकारणही लपून राहिलेले नाही. तीन दशकांपूर्वी इराकवर युद्ध लादणाऱ्या अमेरिकेने सद्दाम हुसैन यांच्यावर अणुयुद्धखोरीचा आरोप करून यामुळे जगाला धोका असल्याचा कांगावा केला होता, परंतु ते युद्ध इराक आणि कुवैत परिसरातील तेल साठ्यांवरील नियंत्रणासाठी असल्याचे कालांतराने स्पष्ट झाले. जागतिक समुदायाच्या विरोधाला न जुमानता सद्दाम हुसैन यांच्यावर आंतरराष्ट्रीय न्यायालयात ठपका ठेवून त्यांना देहदंड सुनावल्यावर संबंधित न्यायालयही अमेरिकेच्याच वळचणीला जाऊन बसल्याचा आरोप त्यावेळी लोकशाहीवादी राष्ट्रांनी केला होता. दुसऱ्या प्रकरणात अमेरिकेच्या जागतिक व्यापार केंद्रावर अल-कायदा या दहशतवादी संघटनेने हल्ला केल्यावर अमेरिकेने कुठलाही विधिनिषेध न बाळगता पकिस्तानातल्या एबोटाबादमध्ये लष्करी कारवाई करून ओसामा बीन लादेनला संपवल्याचे जाहीर केले. स्वतःच्या देशावर दहशतवादी हल्ला झाल्यास किंवा स्वतःच्या देशाचे आर्थिक, राजकीय धोरणाविरोधात आंतरराष्ट्रीय हालचाली झाल्यास व्हाईट हाऊसने नेहमीच जगाला न जुमानता मनमानी कारवाया केल्याचा इतिहास आहे. अमेरिकी लोकांचे सार्वभौमत्व तेवढे महत्त्वाचे, त्यासाठी कुठलीही लष्करी कारवाई करण्यासाठी कोणाच्या परवानगीची आम्हाला गरज नाही, असे अमेरिकेतील समकालीन सत्तेने मोठ्या टेचात जगाला सांगितले होते, मात्र आपल्या सार्वभौम लोकशाहीच्या अधिकारांची जपणूक करताना इतर देशांचा 'तसा' अधिकार व्हाईट हाऊसने वेळोवेळी नाकारला आहे. भारत-पाकिस्तान युद्धसदृश्य स्थितीतही त्यांनी हेच केले आहे. अमेरिकेच्या या कांगाव्यामागे त्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्तेचे महत्त्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न वेळोवेळी उघड झाला आहे. सोबतच रशियाशी कायमच महासत्तेच्या खुर्चीसाठी सुरू असलेले शीतयुद्ध आणि भारतासोबत असलेले रशियाचे मैत्रीसंबंध अमेरिकेला कायमच धोकादायक वाटत आलेले आहेत. युक्रेन युद्धात झेलेन्स्कींना पुतिन यांच्याशी युद्धाबाबत चर्चा करून मार्ग काढण्याचा एकीकडे सल्ला देणाऱ्या अमेरिकेने युक्रेनला मात्र त्यावेळी लष्करी मदत केली. आताही अशीच परिस्थिती आहे, भारत-रशिया मैत्रीसंबंधांचा खूप जुना इतिहास आहे. आशियाई क्षेत्रात रशिया आणि भारताची जोडगोळी वरचढ ठरू नये असे अमेरिकेला वाटते. पाकिस्तानविरोधात सुरू असलेली भारताची लष्करी कारवाई रोखण्यामागे रशियाला शह देण्याचा अमेरकेचा हेतू आहे. ट्रम्प यांनी काश्मीर प्रश्न सोडवण्यात मध्यस्थी करण्यात दाखवलेला रस आशियाई देशांवर नियंत्रणासाठीचा आहे. त्यामागे तेल, महासत्ता, अर्थकारण, विज्ञान तंत्रज्ञानातील विकसनशील देशांचे अवलंबित्व, अमेरिकेच्या भांडवलदारी कंपन्यांच्या कामाचे आशियाई देशांमध्ये होणारे आऊट सोर्सिंग, अमेरिकेसाठी कमालीची लोकसंख्या असलेली दक्षिण आशियाई बाजारपेठ, असे अनेकविध पदर त्यामागे आहेत. अमेरिकेने भारत-पाकिस्तान यांच्यातील युद्धांमध्ये मध्यस्थी केली, त्याची कारणे भू-राजकीय आणि आर्थिक हितसंबंधांचीच राहिली असल्याचा इतिहास फार जुना नाही. १९६० तसेच १९७० च्या दशकात शीतयुद्ध काळात अमेरिका आणि सोव्हिएत युनियन यांच्यात तीव्र स्पर्धा होती. या स्पर्धेमुळे दक्षिण आशियावर प्रभाव पडला. १९७१ च्या युद्धात अमेरिकेने पाकिस्तानला पाठिंबा दिला, मात्र लष्करी सामर्थ्य दिले नाही तर सोव्हिएत युनियन भारताच्या बाजूने होते. सोव्हियत युनियन आणि भारताची लष्करी क्षमता जोखण्याचा शस्त्रास्त्र दुकानदारी करणाऱ्या अमेरिकेचा त्याही वेळेस हेतू होता, असाच हेतू आता चीनचा असल्याची शक्यता नाकारता येत नाही. या युद्धात रशिया भारताचा निर्विवाद मित्र असल्याचे पुन्हा सिद्ध झाले तर तुर्की आणि चीनकडून भारताला असलेला धोकाही स्पष्ट झाला. दहशतवादविरोधात लोकशाही आणि शांतता प्रस्थापित करण्याचे कारण सांगून अफगाणिस्तानात लष्कर उतरवणाऱ्या अमेरिकेने लादेन सापडलेल्या पाकिस्तानात मात्र अत्यंत मर्यादित स्वरुपात कारवाई केली. भाराताविरोधात दहशतवादी कारवायांमध्ये सामील असलेल्या पाकिस्तानातल्या टोळ्यांना संपवण्यात व्हाईट हाऊसने तेवढा रस कधीही दाखवलेला नाही, अगदी अमेरिकेच्या वॉल स्ट्रीट जर्नलचे अमेरिकन पत्रकार डॅनियल पर्लची हत्या पाकिस्तानच्या कराचीत होऊनही अमेरिकेने लष्करी कारवाई टाळली. या हत्येचा बदला भारतीय लष्कराने रौफला संपवून 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये घेतल्याच्या बातम्या आल्या. अमेरिकेने दक्षिण आशियाई क्षेत्रातील युद्धाच्या इतिहासात नेहमीच बचावात्मक आणि स्वतःला अलिप्त ठेवण्याचीच भूमिका घेतली आहे. स्वतःच्या लष्कराची मर्यादित कारवाई, युद्धातील उभय पक्षांचे अंशतः समर्थन आणि विरोध, अशी भूमिका अमेरिकेकडून घेतली जाते. थोडक्यात, आवळा देऊन कोहळा घेण्याची अमेरिकेची नीती राहिलेली आहे. भारतीय लोक सर्वशक्तीनिशी भारतीय लष्कराच्या पाठीशी उभे राहिलेले होते, भारतीय सेना दले पूर्ण जोशात होती आणि आता पाकिस्तानवर रामटोला हाणून दीर्घकालीन त्यांचा बंदोबस्त केला जाणार अशी स्थिती असताना ट्रम्प यांनी खोडा घालून पाकिस्तानला जीवदान दिले आहे. पण हे सगळे करण्यामागे त्यांचा व्यापारी खेळ आणि आपण जगाचे पोलीस आहोत हे दाखवून देणे आहे.

## 'विकसित भारता'साठी...




आपल्या देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. तेव्हापासून ते आजपर्यंत अनेक अडचणींवर मात करून आपण जो प्रवास केला तो निश्चितच अभिमानास्पद असा आहे. आज भारत हा सर्वाधिक वेगाने - म्हणजे सरासरी ६.५ टक्के दराने आर्थिक प्रगती करत असलेला जगातील एकमेव देश आहे. आपली अर्थव्यवस्था सन २०२८मध्ये जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था होणार आहे. तेव्हा आपला जीडीपी ५.७२ ट्रिलियन डॉलर, तर शताब्दी वर्षात ३० ट्रिलियन डॉलर असेल, असा अंदाज असून, ही निश्चितच अभिमानाची गोष्ट आहे.

सन २०४७नंतरही आपली अर्थव्यवस्था जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था म्हणून पुढील अनेक वर्षे राहणार आहे. असे असूनही गरिबी, बेरोजगारी, असमानता, सामाजिक सुरक्षा अशा विविध स्तरांवर आपली अर्थव्यवस्था कमी पडत आहे. संपूर्ण भारताचा विकास करण्यासाठीच 'विकसित भारत २०४७' ही संकल्पना मोदी सरकारने जाहीर केली आहे. समाजातील सर्व घटकांचा सहभाग असल्याखेरीज ही संकल्पना साकार होऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे आपल्या अर्थव्यवस्थेच्या वाढीच्या दरात आणखी किमान दोन टक्के वाढ आवश्यक आहे. म्हणजे तो आठ ते नऊ टक्के झाला तर विकसित भारत हा २०४७मध्ये प्रत्यक्षात येईल; अन्यथा त्यास आणखी पाच ते दहा वर्षे लागतील.

'विकसित भारत २०४७' ही संकल्पना यशस्वी करणे वाटते तेवढे सोपे काम नाही. पण त्यादृष्टीने प्रयत्न केले तर अश्यक्यही नाही. सन २०४७पर्यंत देशाला स्वावलंबी आणि समृद्ध अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याचे सरकारचे ध्येय म्हणजे 'विकसित भारत २०४७'. आर्थिक वाढ, तांत्रिक सुधारणा, पायाभूत सुविधांचा विकास, सामाजिक सक्षमीकरण आणि शाश्वतता हे या कार्यक्रमाचे निकष आहेत. सन २०२५-२६च्या केंद्रीय अर्थसंकल्पात हे साध्य करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अंतरिम अर्थसंकल्पात नमूद केलेल्या या धोरणानुसार संधी निर्माण करण्यासाठी आणि प्रगतीला चालना देण्यासाठी काही प्राधान्यक्रम जाहीर केले होते. यामध्ये शून्य भूकबळी, दर्जेदार व सर्वांना परवडणारे शिक्षण, रोजगारक्षम कौशल्य विकास, महिला सबलीकरण, शेतकरी कल्याण यांचा समावेश आहे. समाजातील घटकांच्या व लाभार्थींच्या विकसित भारत २०४७ या संकल्पनेसंबंधी सूचना, अनुभव, अपेक्षा आपण www.mygov.in या वेबसाइटवर नोंदवू शकता.

या पार्श्वभूमीवर काही गोष्टी विचार करण्याजोग्या आहेत. इंदूर हे शहर भारतातील सर्वांत स्वच्छ शहर म्हणून आपले स्थान सलग १० वर्षे टिकवून आहे. त्याचप्रमाणे इंदूर हे शहर हे नुकतेच (१० मे २०२५ रोजी) 'भिकारीमुक्त' म्हणून घोषित झाले. हे केवळ इंदूरमधील नागरिकांच्या सहभागामुळे शक्य झाले. हे जर इंदूरमध्ये होऊ शकते, तर अन्यत्र का नाही? मुंबईत धारावीचा पुनर्विकास होत आहे. चेंबूर, अँटॉप हिल्स, सायन कोळीवाडा, मालवणी येथेदेखील अशा प्रकारच्या वस्त्या आहेत. पुण्यातदेखील पाटील इस्टेट, दत्तवाडी, जनता वसाहत, गोखले नगर येथे देखील अशा जागा आहेत. या सर्व ठिकाणी पुनर्विकास प्रक्रिया सुरू केल्यास रहिवाशांच्या राहणीमानात खूप चांगले बदल होतील. विकसित भारत २०४७ या मोहिमेत देशातील सर्व नागरिकांचे सहकार्य व सहभाग मिळाला तर विकसित भारताचे हे उद्दिष्ट कदाचित सन २०४७च्या दोन-तीन वर्षे आधीच साध्य होऊ शकते. सशक्त भारतीय, समृद्ध आणि शाश्वत अर्थव्यवस्था यांद्वारे भारताला विकसित राष्ट्रात रूपांतर करण्याची क्षमता आहे. यात आर्थिक वाढ, पर्यावरणीय शाश्वतता, सामाजिक प्रगती आणि सुशासन यासारख्या विकासाच्या विविध पैलूंचा देखील समावेश आहे.

जागतिक बँकेच्या व्याख्येनुसार ज्या देशांचा जीडीपी हा दरडोई १४,००६ अमेरिकी डॉलर इतका असेल अशी राष्ट्रे 'विकसित' म्हणून घोषित केली जातात. भारताचा २०२५चा जीडीपी हा दरडोई २,८८० अमेरिकी डॉलर आहे. २०४७ या वर्षातील वाढती महागाई व राहणीमानाचा विचार केला तर जागतिक बँकेच्या व्याख्येनुसार आपल्या देशाचा जीडीपी हा दरडोई १७,६३५ डॉलरपर्यंत वाढला तरच आपण 'विकसित देश' म्हणून घोषित होऊ. याचाच अर्थ आपल्याला आपल्या अर्थव्यवस्थेचा विकासदर हा दर वर्षी सुमारे १० टक्के करावा लागेल, तेव्हा कुठे आपण या जागतिक बँकेच्या व्याख्येप्रमाणे ह्यविकसित राष्ट्रह्न म्हणून घोषित होऊ शकतो. क्षणभर हा मुद्दा आपण बाजूला ठेवला व आपला दर वर्षीचा सरासरी आर्थिक विकासदर हा आठ टक्के जरी गाठू शकलो तरी २०४७ या वर्षात आपला दरडोई जीडीपी १४ हजार अमेरिकी डॉलर होऊ शकेल. यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे चलनांच्या खरेदी शक्ती समतेचा विचार केला तर २०४७ या वर्षात आपला दरडोई जीडीपी नऊ ते दहा हजार अमेरिकी डॉलरपर्यंत पोहोचला तरी आपला देश हा खऱ्या अर्थाने 'विकसित भारत' होऊ शकतो.

भारतातील चांगले राहणीमान हे अमेरिकेच्या तुलनेत खूप स्वस्त आहे. जागतिक बँकेने केलेली विकसित देशाची केलेली व्याख्या ही केवळ पाश्चिमात्य विकसित देशापुरती लागू आहे, असे माझे मत आहे. विकसनशील किंवा अविकसित देश यांना ही व्याख्या कितपत लागू होईल, याबाबत मी साशंक आहे. इतर देशांच्या चलनांचा तुलनात्मक विचार केला तर, अमेरिकी डॉलरची किंमत विनाकारण, अवास्तव वाढलेली आहे, असे आपल्या असे लक्षात येईल. भारताच्या दृष्टीने विचार करता अमेरिकी डॉलरचे जागतिक व्यापारातील महत्त्व हळूहळू कमी होत जाईल व भारतीय रुपया सक्षम होण्यास त्याची मदत होईल. नजीकच्या भविष्यकाळात भारतीय रुपया केवळ स्थिरच होईल असे नाही, तर सक्षमही होईल. अमेरिकेतील ट्रम्प सरकारच्या आयात-निर्यात कर प्रणाली धोरणामुळे जागतिक बाजारपेठेत असंतुलन, मंदीसदृश, तसेच अस्थिर वातावरण आहे. जगातील अनेक देशांशी भारताने रुपयात आयात निर्यात धोरण करार केल्यामुळे सक्षम होणार रुपया, सुमारे ५० देशांशी मुक्त व्यापार, विविध देशांच्या समूहांशी आयात-निर्यात करार यामुळे आपली निर्यात वाढेल, तसेच आयात कमी खर्चात होईल. यामुळे उत्पादकांचा फायदा वाढेल, भारतीय ग्राहकांना वस्तू थोड्या कमी किमतीत मिळतील. परिणामी महागाईवरही नियंत्रण करता येईल. आपल्या आर्थिक समृद्धीसाठी या बाबी साह्यभूत आहेत. अर्थात, आणखी २२ वर्षांचा कालावधी जायचा आहे. या प्रवासात काही अडचणीदेखील येतील; पण आपण त्या अडचणींवर मात करू शकतो, हा आत्मविश्वास आपल्या अर्थव्यवस्थेच्या रचनेत आहे ही एक जमेची बाब आहे. या सर्वांचा परिणाम म्हणजे रोजगार, आर्थिक उत्पन्न, राहणीमान यात सकारात्मक बदल होतील.

अमेरिकी अर्थतज्ञ फ्रान्सिस फुकुयामा यांनी १९९२मध्ये विकसित केलेल्या डेन्मार्क गोल सिद्धांतानुसार, आर्थिक विकासासोबत समाजाचा सर्वांगीण सामाजिक, आर्थिक विकास होत नसेल तर केवळ आर्थिक विकास निरर्थक आहे. हे तत्त्व लक्षात ठेवून पावले उचलली तर आपले विकसित भारत २०४७ हे स्वप्न सत्यात येऊ शकेल, यात शंका नाही.

## घोटाळ्यांची खिचडी




कोरोनासारख्या साथरोगाच्या काळात लोकांची आयुष्यं पणाला लागली होती, स्मशानात चिता धगधगत होत्या, लोक जीवरक्षक औषधांसाठी सैरावैरा पळत होते. अशा कठीण काळात काही व्यावसायिकांना मात्र सरकारी यंत्रणा, महापालिकांना चुना लावून आपले खिसे भरण्याचे सुचत होते. कोरोना काळातील खिचडी घोटाळ्यावर नजर टाकल्यास असेच दिसते. आतापर्यंत सक्तवसुली संचालनालय आणि मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणाची चौकशी केली आहे व या प्रकरणी आठ जणांविरोधात आरोपपत्र दाखल झाले, त्यात साडेचौदा कोटी रुपयांची अफरातफर झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. शिवसेना-उद्धव ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते व आदित्य ठाकरे यांचे निकटवर्ती सूरज चव्हाण यांना या प्रकरणी सक्तवसुली संचालनालयाकडून अटकही झाली होती. माजी मंत्री, खासदार गजानन कीर्तीकर यांचे पुत्र अमोल कीर्तीकर, संजय राऊत यांचे निकटवर्ती सुजित पाटकर यांचेही नाव त्यात आढळले आहे. राजकीय साटेलोट्यामुळे या प्रकरणाला राजकीय सूडबुद्धीच्या कारवाईचा संशय चिकटणे स्वाभाविक होते. या प्रकरणाला पाच वर्षे होऊनही त्याचा निकाल लागलेला नाही. राजकीय संबंध असल्यानेच ही लढाई न्यायालयीन स्तरावरही ताकदीने लढली जाईलच. परंतु, काही प्रश्न मुळापासूनच उभे राहतात. वाळू-विटा पुरविणारा उद्योग कामगारांसाठी खिचडी पुरविण्याकरिता पात्र कसा ठरू शकतो? स्वयंपाकघर आदी मूलभूत सुविधा आहेत का, याची खातरजमा तरी पालिका अधिकाऱ्यांनी केली होती का? राजकीय लागेबांधे नसते, तर अशी कंत्राटे सामान्य माणसाला मिळू शकली असती का? मापात वाटमारी करायची आणि एकेका पाकिटामागे अधिकचे पैसेही घ्यायचे, अशा क्लृप्तीद्वारे केलेला हा घोटाळा कोट्यवधी रुपयांच्या घरांत गेला.

## जातनिहाय जनगणनेचे महिला आरक्षण होऊ नये!

**जिसकी जितनी संख्या भारी, उसकी उतनी भागीदारी अशी घोषणा देऊन बहुजन समाज पार्टीचे संस्थापक कांशीराम यांनी उत्तर प्रदेशचे राजकारण बदलले. याच घोषणेचा आधार घेत काँग्रेसने देशामध्ये जातीय जनगणनेचा आग्रह धरला. त्यांची ही मागणी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने बुधवारी एक प्रकारे मान्य केली आहे. आगामी जनगणनेवेळी देशभरात जातीनिहाय जनगणना करण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या अध्यक्षतेतील राजकीय विषयांच्या कॅबिनेट कमिटीने केली आहे. महिला आरक्षणाप्रमाणेच हा निर्णय ठरणार नाही, याची दक्षता आता केंद्र सरकारलाच घ्यावी लागणार आहे.**

काश्मीरमधील पहलगामध्ये झालेल्या दहशतवादी हल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने उच्चस्तरीय बैठका घेत आहेत. त्यातच बुधवारी नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेतील राजकीय विषयांच्या कॅबिनेट बैठकीची माहिती समोर आली आणि आता केंद्र सरकार दहशतवादाविरोधात काहीतरी मोठा निर्णय घेणार, काही मोठी घोषणा करणार असे वाटत होते.

मात्र मोदी सरकारच्या राजकीय विषयक कॅबिनेटने बुधवारी अचानक जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला. कालपर्यंत भारतीय जनता पक्ष ज्या विषयाला हात लावण्यासही तयार नव्हता. जातीनिहाय जनगणना हा देशातील जातीजातींमध्ये फूट पाडण्याचा प्रकार असल्याची संभावना भाजप नेते आणि त्यांच्या आयटी सेलकडून होत होती.

काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीवर टीका करण्यासाठी भाजपकडून सर्वच राजकीय शस्त्रास्त्र बाहेर काढली जात होती, आता त्याच भाजपप्रणित एनडीए सरकारच्या मंत्रिमंडळाने जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घेतला आहे. हा भाजपच्या सामान्य कार्यकर्त्यांसह देशातील सर्वांसाठीच एक मोठा धक्का आहे.

कारण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भाषणे आठवून पाहिली तर लक्षात येईल की, काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या जातीनिहाय जनगणनेच्या मागणीला प्रत्युत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदींनी कधी नव्हे ते उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या घोषणेचा आधार घेतला. आदित्यनाथांनी बटेंगे तो कटेंगे अशी घोषणा दिली.

पंतप्रधान मोदींनी याच घोषणेची सुधारीत आवृत्ती आणली, एक है तो सेफ है. महाराष्ट्र विधानसभेवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी ही घोषणा देण्यापूर्वी काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या जातनिहाय जनगणनेवर टीका करत. मोदींनी म्हटले होते की, मी फक्त चारच जाती मानतो, गरीब, शेतकरी, महिला आणि युवक, याच चार जाती देशात आहेत. जातीनिहाय जनगणनेला त्यांनी तेव्हा गरीब-श्रीमंत असे उत्तर दिले होते.

२०२४ लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनात लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी जातीनिहाय जनगणनेची मागणी केली होती. याच सभागृहात जातीनिहाय जनगणनेचा निर्णय मान्य होईल आणि जातीनिहाय जनगणना झाल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास त्यांनी अवघ्या दहा-अकरा महिन्यांपूर्वी व्यक्त केला होता.

तेव्हा सत्ताधारी बाकांवरुन त्यांना प्रचंड विरोध झाला. भाजप खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांनी तर त्यांच्यावर वैयक्तिक हल्लाबोल केला. मात्र तरीही राहुल गांधी यांनी त्यांची मागणी सोडली नाही. अखेर केंद्र सरकारला जातीनिहाय जनगणनेचा निर्णय घ्यावा लागला आहे. त्यांच्या या निर्णयाचे राहुल गांधींसह विरोधी पक्षातील सर्वांनी स्वागत केले आहे.

केंद्र सरकारने आताच हा निर्णय का घेतला, याचे उत्तर मात्र सध्यातरी कोणाकडेच नाही. पहलगामधील हल्ल्यानंतर दोनच दिवसांनी अर्थात २४ एप्रिल रोजी पंतप्रधान मोदी बिहारमध्ये जातात, राजकीय सभेला, एकाअर्थाने निवडणूक सभेला संबोधित करतात. त्यानंतर सहा दिवसांनी, ३० एप्रिल रोजी जातीनिहाय जनगणनेची केंद्रीय मंत्रिमंडळाकडून घोषणा होते. यामुळे या निर्णयाला याच वर्षी होणाऱ्या बिहार विधानसभा निवडणुकीची पार्श्वभूमी कारणीभूत मानली जात आहे.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारच्या जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. अखेर आमचा मुद्दा केंद्र सरकारला मान्य करावा लागला, असे त्यांनी म्हटले आहे. केंद्र सरकारच्या बुधवारच्या घोषणेआधी काँग्रेसने कर्नाटक आणि तेलंगणात जातनिहाय जनगणना केली आहे.

बिहारमध्ये नितीशकुमार आणि भाजप एकत्र असतानाच जातनिहाय जनगणनेचा निर्णय २०२२ मध्ये झाला होता. या निर्णयाची अंमलबजावणी आणि आकडेवारी मात्र नितीशबाबूंनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेस आणि लालू यादवांच्या राष्ट्रीय जनता दलासोबत घरोबा केल्यानंतर महागठबंधन सरकारने २०२३ मध्ये जाहीर केली होती. या आकडेवारीनुसार महागठबंधन सरकारने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादाही ओलांडत ६५ टक्के आरक्षणाचा निर्णय घेतला होता.

या निर्णयाला पाटणा उच्च न्यायालयाने स्थगिती दिली, सर्वोच्च न्यायालयानेही ही स्थगिती हटवलेली नाही. तेव्हापासूनच जातनिहाय जनगणनेची मागणी अधिक जोरकसपणे पुढे आली. २०२४ लोकसभा आणि त्यानंतर महाराष्ट्र विधानसभेत या मागणीला अधिक धार मिळाली.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी संसेदत म्हटले होते की, तुम्ही कोणाकोणाचा अंगठा कापला आहे. ते या जनगणनेच्या माध्यमातून समजून येईल. राहुल गांधींनी फक्त जातिनहाय जनगणनेची मागणी केलेली नाही. त्यांना फक्त ओबीसींचा आकडा नको आहे, तर त्यांनी सरकारी योजना, नोकरी, संपत्ती यामध्ये मागासवर्गीय, आदिवासी आणि ओबीसी आणि खुल्या प्रवर्गातील लोकांची किती भागिदारी आहे याचेही आकडे पाहिजे.

कोणाकडे किती संपत्ती आहे आणि कोण वषार्नुवर्षे हक्क, अधिकार, समतेच्या तत्वापासून कंगाल राहिले आहे. ते कोणत्या जात समूहातील आहेत. अधिकार आणि संपत्तीचे केंद्रीकरण कोणत्या जातींमध्ये झाले आहे, त्याचाही डेटा तयार झाला पाहिजे. तरच खऱ्या वंचितांना लाभ पोहचवता येईल, अशी त्यांची भूमिका आहे. हा समाजाचा एक्स-रे आहे. त्यासाठी जातनिहाय जनगणनेची मागणी होत आहे.

यासाठी राहुल गांधींनी अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी होर्णाया हलवा सेरेमनीचा फोटो संसदेत दाखवला होता. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासोबतच्या फोटोमध्ये एकही दलित, आदिवासी एवढंच काय ओबीसी सचिवदेखील नाही, हे त्यांनी दाखवून दिले होते. जर देर्णायांमध्ये या समुदायातील एकही व्यक्ती नसेल तर त्यांच्या समाजाच्या वाट्याला अर्थसंकल्पातून काय मिळणार, असा रोकडा सवाल त्यांनी केला होता. त्यानंतर हलवा सेरेमनीचे फोटो येणेच बंद झाले.

वास्तविक जातनिहाय जनगणनेवर याच सरकारने २०२१ मध्ये सर्वोच्च न्यायालयात शपथपत्रावर सांगितले होते की, २०११ मध्ये करण्यात आलेल्या सामाजिक, आर्थिक आणि जातनिहाय जनगणनेतील आकडेवारी ही चुकीची आहे. त्यामध्ये अनेक चुका झाल्या होत्या. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्राचे उदाहरण दिले होते.

१९३१ मध्ये करण्यात आलेल्या जनगणनेत महाराष्ट्रात अधिकृत अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसीमध्ये येर्णाया जातींची संख्या ४९४ सांगितली गेली होती. मात्र २०११ मधील जनगणनेत महाराष्ट्रातील या जातींची संख्या ४,२८,६७७ आढळून आली आहे. त्यामुळे जातीय जनगणना करणे कठीण असल्याचे याच सरकारने सर्वोच्च न्यायलयात सांगितले होते. आता तेच सरकार जातनिहाय जनगणनेचे शिवधनुष्य कसे पेलणार, हाही प्रश्नच आहे.

आता राहिला मुद्दा जनगणना केव्हा होणार? खरं तर जनगणना २०२१ मध्येच व्हायला पाहिजे होती. मात्र तेव्हा कोरोनाचे कारण पुढे करत जनगणना करण्यास केंद्र सरकारने नकार दिला. कोरोना संपल्यानंतर जनगणना होण्यात कोणतीही अडचण नव्हती. मात्र तरीही गेल्या पाच वर्षांत जनगणनेकडे मोदी सरकारने ढुंकूनही पाहिले नाही. २०२४ मध्ये सांगितले गेले की, यावर्षी निवडणूक आहे, त्यामुळे जनगणना झाली नाही.

पुढील वर्षीही जनगणना होण्याची शक्यता नाही. कारण या वर्षाच्या अर्थसंकल्पात त्यासाठीची आर्थिक तरतूदच नाही. जनगणनेसाठी फक्त ५७४ कोटींची घोषणा केली आहे. मागील अर्थसंकल्पीय तरतुदीच्या तुलनेत (१३४१ कोटी) हा आकडा अर्धा देखील नाही. त्यामुळे २०२५ या वर्षात जनगणना होणे शक्य दिसत नाही. जनगणना केव्हा होणार हे आधी सरकारने स्पष्ट करण्याची गरज आहे. त्यानंतरच जातीनिहाय जनगणनेची त्यांची मनिषा किती प्रामाणिक आहे, हे स्पष्ट होणार आहे.

अन्यथा ज्याप्रमाणे महिला आरक्षणाची घोषणा लोकसभा निवडणुकीपूर्वी झाली, मात्र ते आरक्षण लागू केव्हा होणार हे अजूनही निश्चित नाही. तसेच काही जातनिहाय जनगणनेबाबत होणार नाही, याची काय शाश्वती. जनगणना होईलदेखील, मात्र आरक्षणाचे ५० टक्के मर्यादेचे त्यानंतर काय करणार हेही अजून केंद्र सरकारने स्पष्ट केलेले नाही. त्यामुळे आताही घोषणा झाली आहे, चचेर्ला सुरुवात झाली आहे. तेव्हा यातून सकारात्मक काय बाहेर येते याची अजूनतरी वाटच पाहावी लागणार आहे.

## जमीन संपादन आणि शेतकरी



एकीकडे नव्या मुंबईतील विमानतळ सुरू होण्याच्या उंबरठ्यावर असताना दुसरीकडे पुणे जिल्ह्यातील पुरंदर येथील नियोजित विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेला विरोध करणारे ग्रामस्थ आणि पोलिसांमध्ये संघर्ष होऊन झालेली दगडफेक, लाठीमार आणि अश्रुधुराची घटना दुदैर्वी आहे. या घटनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित 'ड्रोन सर्व्हे'ची प्रक्रिया तात्पुरती स्थगित केली असून शेतकऱ्यांना मोबदल्याबाबत आठवड्यात नेमक्या मागण्या सादर करण्याचे आवाहन केले; मात्र विमानतळ त्याच ठिकाणी होणार असेही स्पष्ट केले आहे.

प्रामुख्याने संवादाच्या अभावी हा संघर्ष चिघळत असून जबाबदार मंडळींनी वेळीच लक्ष घातले नाही, तर याला वेगळे वळण लागू शकते. पुणे शहर व परिसरासह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळ हवा, ही पूर्वीपासूनची मागणी आहे. त्या दृष्टीने आधी खेड तालुक्यातील नियोजित विमानतळाचा प्रस्ताव विरोधामुळे बारगळला. नंतर पुरंदर येथील जागेवर हा विमानतळ व्हावा, अशी चर्चा व मान्यतेच्या प्रक्रियेचे कवित्व गेली नऊ वर्षे सुरू आहे. मध्यंतरी येथील जागा बदलण्याचा विचार पुढे आला होता; मात्र आता पुन्हा पूर्वीचीच जागा निश्चित झाली असून येथील सात गावांतील जागेबाबत अधिसूचनाही प्रसिद्ध झाली आहे. या गावांतील ग्रामस्थांमध्ये विमानतळाचे समर्थन आणि विरोध अशा संमिश्र भावना आहेत. सरकारकडून प्रकल्पग्रस्तांना चौपट मोबदला, संबंधितांना नोकरी आणि नियोजित प्रकल्पात भागीदारी असे पर्याय देण्यात येत आहेत.

ग्रामस्थांना माहिती देण्यासाठी मेळावेही घेण्यात आले आहेत. मात्र, बाधित होणारी जमीन पाहता आपल्या पदरात नेमके काय पडणार, याबाबत संभ्रम असून प्रशासनाच्या वतीने ठोस माहिती देण्याबाबत टोलवाटोलवी सुरू असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. या भागात जानाई-शिरसाई योजनेचे पाणी आल्याने बराच भाग बागायती होण्याच्या मार्गावर आहे, त्यामुळेही मोबदल्याबाबत मतभेद निर्माण होत आहेत. समर्थन आणि विरोधाला काही प्रमाणात राजकीय पदरही आहेत; अर्थात आपल्या जमिनीसाठी अधिकाधिक मोबदला मिळावा, ही शेतकऱ्यांची भूमिका न्याय्यच आहे.

आता प्रकल्प वेळेत मार्गी लावायचा असेल, तर शेतकऱ्यांना विश्वासात घेणे, ही अर्थातच सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी त्यांच्याशी सामूहिक आणि वैयक्तिक संवाद साधून सर्व शंकांचे निरसन केले पाहिजे. मुख्यमंत्री-पालकमंत्री अशा जबाबदार नेत्यांनी राजकारण बाजूला ठेवून पुढाकार घेतला पाहिजे. असे संघषार्चे प्रसंग उद्भवणे प्रकल्पाच्या दृष्टीनेही हितकारक नाही.

# चटकदार रीव्हर्स वडापाव



**साहित्य :** ४ व्हाइट ब्रेड स्लाइस, बेसन, हिरवी चटणी, लाल सुकी चटणी, ६ पाकळ्या बारीक चिरलेला लसूण, आल्याचा तुकडा ठेचलेला, कढीपत्ता, १ कांदा बारीक चिरलेला, बेकिंग सोडा, हिंग, जिरे, मोहरी, हिरवी मिरची बारीक चिरलेली, मीठ, ४ उकडून कुस्करलेले बटाटे, कोथिंबीर बारीक चिरलेली, तेल.

**भाजीची कृती :** प्रथम पॅनमध्ये १ टेबलस्पून तेल गरम करायला ठेवा. तेल तापले की, त्यात जिरे, मोहरी, कढीपत्ता, हिंग, लसूण, आले, हिरवी मिरची, कांदा व हळद घालून नीट ढवळून एक करा. कांदा लालसर झाला की त्यात कुस्करलेला बटाटा घाला व मिश्रण नीट परतवत राहा. नंतर आवश्यक तेवढे मीठ घाला आणि झाकण ठेवून एक वाफ काढा. मग कोथिंबीर घाला व गॅस बंद करा.

**बेसनाचा घोळ :** एका बाऊलमध्ये बेसन घ्या. त्यात १/२ टीस्पून प्रत्येकी बेकिंग सोडा, हळद व मीठ घाला. आवश्यकतेनुसार पाणी घालून बेसनाचा घोळ तयार ठेवा.

**सँडविच कृती :** ब्रेड स्लाइसच्या कडा कापून घ्या व चार चौकोनी तुकडे करा. एका तुकड्यावर हिरवी चटणी लावा व त्यावर लाल चटणी टाका. दुसरा ब्रेडचा तुकडा त्यावर ठेवा. अशाप्रकारे सर्व सँडविच करून घ्या. आता पॅन गॅसवर गरम करायला ठेवा व त्यात थोडे तेल घालून पसरवा. तेल तापल्यावर तयार छोटे सँडविच दोन्ही बाजूनी भाजून घ्या.

**कृती :** वरील तयार भाजीचे गोळे करून तयार ठेवा. एक गोळा घेऊन हातावर त्याची पाती करा व पातीवर वरील सँडविच ठेवा. वरून दुसरी पाती ठेवा व सँडविच बटाट्यानी नीट बंद करून हलक्या हाताने दाबा. अशाप्रकारे सर्व सँडविचचे वडे तयार करून घ्या. कढईत तळण्यासाठी मध्यम आचेवर तेल तापायला ठेवा. आता प्रत्येक वडा बेसनाच्या घोळात बुडवून तेलात तळून घ्या व मधून कापून चटणी किंवा सॉसबरोबर गरम गरम सर्व्ह करा.

# केसांना तेल लावताना घ्या 'ही' काळजी

**केसांचं आरोग्य जर निरोगी राखायचं असेल तर त्यांची नीट काळजी घेणं गरजेचं आहे. लांबसडक, काळेभोर केस असावेत अशी प्रत्येक तरुणीची इच्छा असते. मात्र असे केस मिळवण्यासाठी केसांना दररोज तेल लावणं गरजेचं आहे. केसांना दररोज तेल लावल्यामुळे केसांची मुळं मजबूत होतात. त्यासोबतच डोक्यावरील त्वचेसाठीही तेल तितकंच गरजेचं असतं. तेलामुळे डोक्यावरील त्वचेला पोषण मिळतं. तसंच रक्तपुरवठाही सुरळीत होतो.**

**केसांसाठी**

नारळाचं तेल, बदामाचं तेल किंवा मोहरीचं तेल विशेष गुणकारी असतं. या तेलाचा वापर केल्यामुळे केस काळेभोर आणि घनदाट होण्यास मदत होते. मात्र तेलाचा वापर करताना काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं गरजेचं आहे. चला तर मग जाणून घेऊयात तेल लावताना कोणत्या गोष्टी कराव्यात आणि कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी -

**डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे**

तेल लावताना डोक्यावरील त्वचेकडे लक्ष देणे विशेष गरजेचं आहे. त्यासोबतच केसांच्या मुळाकडेही तितकंच लक्ष द्यावं लागतं. केसांची मूळ मजबूत असतील तर केसांची वाढ लवकर होते. त्यासोबतच केसांची गळतीदेखील होत नाही. डोक्यावर नारळाच्या तेलाने मसाज केल्यास याचा परिणाम लवकर दिसून येतो.



**रोज केसांना मसाज करावा**

केसांच्या आरोग्यासाठी केसांना केवळ तेल लावणं हा उपाय नाही तर तेल लावण्यासोबतच केसांच्या मुळांना मसाज करणेदेखील गरजेचं आहे. मसाज करण्यासाठी शक्यतो कोमट तेलाचा वापर करावा. कोमट तेलाने मसाज केल्यामुळे केसांची मुळं बळकट होतात.

**तेल लावणं कधीही विसरू नका**

केसांना तेल लावल्यामुळे अनेक वेळा केसांमध्ये चिकटपणा निर्माण होतो, अशी तक्रार महिला वर्गातून येत असते. त्यामुळे अनेक वेळा तरुणी केसांना तेल लावण्याचं टाळतात. मात्र केसांना तेल न लावण्याची चूक कधीही करू नका. केसांच्या वाढीसाठी तेल लावणं महत्त्वाचं आहे. घराच्या बाहेर पडल्यानंतर केसांना धूळ, माती, प्रदूषण या साऱ्या घटकांचा सामना करावा लागतो. त्यामुळे केस कोरडे होतात. परिणामी केसांचं गळण्याचं आणि केस तुटण्याचं प्रमाण वाढतं. या साऱ्या समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केसांना तेल लावणं गरजेचं आहे.



**तेल किंवा शाम्पूचा अतिरेकही करू नये**

कोणतीही गोष्ट प्रमाणापेक्षा जास्त झाली तर त्याचे दुष्परिणामही सहन करावे लागतात. त्यामुळे तेल असो किंवा शाम्पू दोघांचाही वापर प्रमाणात असावा. जर डोक्यावर तेलाचा जास्त मारा झाला तर डोक्यावरील भार वाढतो आणि केसदेखील तेलकट दिसून लागतात.

# उन्हाळ्यात फूड पॉइजनिंगपासून बचावासाठी ४ प्रभावी उपाय

**उन्हाळ्यात बाहेरचा आहार घेणे अनेकदा त्रासदायक ठरतं. उन्हाळ्यात खाद्यपदार्थ लवकर खराब होतात आणि यामुळेच फूड पॉइजनिंगचा त्रास उद्भवतो. अशाच काही टिप्स लक्षात ठेवल्या तर यापासून वाचता येऊ शकतं.**

**• लिंबाचे सेवन**

लिंबात अँटी-इंफ्लेमेटरी, अँटीबेक्टेरियल आणि अँटीव्हायरल गुण आढळतात. म्हणून लिंबू पाणी पिण्याने बॅक्टेरिया मरतात. आपण रिकाम्यापोटी लिंबू पाणी पिऊ शकता. शक्य असल्यास गरम पाण्यात लिंबू पिळून पिऊ शकतात. परंतु पाणी स्वच्छ असावे याची काळजी घेणे अती आवश्यक आहे.

**• तुळशीचे सेवन**

तुळशीत आढळणारे अँटीमिकोबियल गुणधर्म सूक्ष्मजीवांच्या सामोरे जातात. तुळस अनेक प्रकारे आहारात सामील करता येईल. दह्यात तुळशीचे पान, काळीमिरी आणि मीठ घालून सेवन करू शकता किंवा चहात तुळशीचे पान टाकून सेवन करू शकता.

**• दह्याचे सेवन**

दही एका प्रकारे अँटीबायोटिक आहे आणि यात जरा काळं मीठ घालून खाल्ल्याने आराम मिळेल.

**• लसणाचे सेवन**

लसणात अँटी फंगल गुण असल्यामुळे सकाळी रिकाम्या पोटी लसणाच्या १-२ पाकळ्या पाण्यासह घेतल्याने आराम मिळेल.



# बहुगुणकारी ताडगोळे

**ताडगोळे हे फळ वर्षामध्ये ठरावीक ऋतूमध्ये, म्हणजे उन्हाळ्यामध्ये उपलब्ध असणारे फळ आहे. याची चव काहीशी शहाळ्यातील मलई प्रमाणे लागत असून, चवीला हे फळ मधुर असते. इंग्रजी भाषेमध्ये 'आईस ॲपल' या नावाने ओळखले जाणारे हे फळ आरोग्याच्या दृष्टीने देखील अतिशय गुणकारी असल्याचे म्हटले जाते. या फळाला मुंजाल या नावानेही काही प्रांतांमध्ये ओळखले जाते. या फळाचे आरोग्यासाठी असणारे फायदे जाणून घेऊ या...**



**ज्यांना** वजन घटवायचे असेल, त्यांच्यासाठी या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळाच्या गरामुळे आणि यामध्ये असलेल्या रसामुळे भूक शमण्यास मदत होते. त्यामुळे वारंवार काही ना काही खाण्याची इच्छा होत नाही. ज्यांना लिव्हरशी निगडित काही समस्या असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उपयुक्त आहे. या फळामध्ये पोटॅशियम मुबलक मात्रेमध्ये असून त्यामुळे लिव्हरमध्ये साठलेले घातक, विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते. या फळाच्या सेवनामुळे शरीराला श्रम करण्यासाठी आवश्यक ताकद आणि ऊर्जा मिळत असते. या फळाच्या सेवनामुळे शरीरातील ग्लुकोजची पातळी वाढत असल्यामुळे दिवसभराच्या कामासाठी लागणारी ताकद या फळाच्या सेवनाने मिळत असते.

या फळाच्या सेवनाने शरीराला आवश्यक असलेले क्षार आणि इतर पोषक तत्त्वे संतुलित मात्रेमध्ये मिळत असतात. ज्यांना त्वचेवर उन्हाळ्यामुळे सतत पुरळ येत असेल किंवा ज्यांना या दिवसांमध्ये चेहऱ्यावर सतत मुरुमे येत असतील त्यांच्यासाठी देखील या फळाचे सेवन उत्तम आहे. या फळामध्ये कर्करोगप्रतिरोधी तत्त्वे असून, विशेषतः महिलांमध्ये आढळणाऱ्या स्तनाचा कर्करोग टाळण्यासाठी या फळाचे सेवन उत्तम मानले गेले आहे. या फळामध्ये अँथोसायनिन नामक फायटोकेमिकल स्तनाच्या कर्करोगापासून बचाव करणारे आहे. आरोग्यासाठी या फळाचे फायदे पुरेपूर मिळवण्यासाठी उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये या फळाचे भरपूर सेवन करावे.

# कोणतेही ॲप डाऊनलोड करताना राहा सावध!

## 'या' ४ गोष्टींकडे द्या विशेष लक्ष, नुकसान होणार नाही

**युजर्स** गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहिती आहे का? गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे कधी-कधी धोकादायक ठरू शकते. कसे ते जाणून घ्या. आजकाल प्रत्येकाकडे स्मार्टफोन असतो आणि त्यामध्ये अनेक ॲप्स असतात. या ॲप्समुळे रोजची अनेक महत्त्वाची कामे कुठल्याही अडचणींशिवाय पार पडतात. अनेक जण गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करतात. पण तुम्हाला माहीत आहे का की, काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. तुम्ही अँड्रॉइड युजर असाल तर ही विशेष माहिती नक्कीच तुमच्या कामी येईल. पाहा डिटेल्स.



**हे असू शकते धोकादायक**

काही वेळा गुगल प्ले स्टोअरवरून ॲप्स डाऊनलोड करणे धोकादायक ठरू शकते. कारण, गुगल प्ले स्टोअर मालवेअर आणि हॅकर्ससाठी ॲप्स फारसे स्कॅन करत नाही. अशा परिस्थितीत गुगलच्या स्टोअरवर मालवेअर प्रभावित ॲप्स असण्याची शक्यता आहे. तुम्ही हे ॲप डाऊनलोड केल्यास ते तुमचा वैयक्तिक डेटा चोरू शकतात. हे तुमची आर्थिक ओळखपत्रे देखील चोरू शकतात.

**असे सुरक्षित रहा**

तुम्ही डाऊनलोड करत असलेले ॲप तुम्हाला कोणत्या परमिशन्स विचारतात याकडे नेहमी लक्ष दिले पाहिजे. उदाहरणार्थ- तुम्ही एडिटिंग ॲप डाऊनलोड केल्यास ते ॲप तुम्हाला स्टोरेज, कॅमेरा, मायक्रोफोन आणि फोटो गॅलरी यासाठी परवानगी मागते. पण त्या ॲपला कोणत्या परवानग्या हव्यात याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. जेव्हाही आपण एखादे ॲप डाऊनलोड करतो तेव्हा त्याचे रिव्ह्यू नक्की वाचा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण, लोक त्यांच्या ॲपच्या अनुभवावर आधारित रिव्ह्यू देतात. तुम्हाला ॲपचे वाईट रिव्ह्यू आढळल्यास ॲप डाऊनलोड करू नका.

जेव्हा तुम्ही एखादे ॲप डाऊनलोड करता, त्याआधी ते ॲप किती वेळा डाऊनलोड केले आहे ते पहा. ही तपासणी करणेदेखील महत्त्वाची आहे. कारण, जितक्या जास्त लोकांनी ॲप डाऊनलोड केले आहे तितकाच ॲपवर अधिक विश्वास निर्माण होतो.

गुगल प्ले स्टोअरवर प्रत्येक ॲप निर्माता त्यांच्या ॲपबद्दल तपशील देतो. त्याचा स्त्रोत काय आहे हेदेखील सांगतो. जर तुम्हाला स्त्रोत योग्य वाटत असेल किंवा तपशील बरोबर असतील तरच ॲप डाऊनलोड करा.

**फेफरे (फिट्स) हा आजार आपल्या मेंदूशी संबंधित आहे. आपल्या मेंदूमध्ये अतिसुक्ष्म वाहिन्या असतात, त्यांना न्यूरॉन असे म्हटले जाते. न्यूरॉन आपापसात नेहमी संपर्कात असतात. एकमेकांना संदेशाचे आदानप्रदान करत असतात. संदेश वहन करण्याचे कार्य इतक्या प्रचंड वेगाने होत असते की, त्याने आपल्या मेंदूत रासायनिक व विद्युत तरंग निर्माण होतात. परंतु, एखाद्या संदेशाचे व्यवस्थित वहन न होता तो वाहिनीत अडकून पडतो. मेंदूचे संतुलन बिघडते व त्यामुळे आपल्याला फिट्स येतात. पण घाबरून जाऊ नका. फिट्सवर घरगुती उपचार आहेत.**

# फिट्स आल्यास घाबरू नये

**फिट्स** दोन मिनिटांपेक्षा जास्त वेळाची नसते. ती केव्हाही व कोणत्याही वयाच्या व्यक्तीला येऊ शकते. अचानक आपल्याला चक्कर येऊन आपण जमिनीवर पडतो व शुद्ध हरपते. फिट्स आल्यानंतर आपल्या हातापायात कंप निर्माण होतात. तोंडातून फेस येतो. वारंवार फिट्स येत असेल तर आपल्याला खालील टिप्स उपयोगी पडू शकतात.

▮ अक्कलकाढा १०० ग्रॅम व लिंबू सत्त १०० ग्रॅम यांचे मिश्रण मधामध्ये एकजीव करून ५ ग्रॅम प्रतिदिन सकाळी काहीही न खाण्यापूर्वी चाखल्याने फिट्स येणे कायमचे दूर होते.

▮ सालवटीचे चूर्ण एक ग्रॅम प्रतिदिन मधासोबत चाखावे. त्यानंतर दूध प्यावे. असे नियमित केल्याने जुनाट फिट्स दूर होतात.

▮ शुद्ध हरपलेल्या व्यक्तीला लसूण कुटून वास दिल्यास तो शुद्धीवर येतो.

▮ रोज ३-५ लसणाच्या पाकळ्या दुधात टाकून ते प्यायल्याने फिट्स येत नाहीत.

# आरामदायक 'ट्रेंडी' पँट



**फॅशनच्या** जगात महिलांसाठी पँटचे पुनरागमन झाले आहे. पॅरिस फॅशन शो असो की लक्मे फॅशन वीक सगळीकडे पँट्स परिधान केलेल्या मॉडेल दिसू लागल्या आहेत. एवढंच नव्हे तर फॉर्मलशिवाय याचा उपयोग कॅजुअल्समध्ये देखील होताना दिसत आहे.

सध्या कॉर्पोरेट कल्चरमुळे कपडे घालण्याच्या पद्धतीत कमालीचा बदल जाणावत आहे. मुली फॅशनसोबतच आरामालाही महत्त्व देत आहेत. म्हणूनच जीन्स-ट्राऊजरसारखे कपडे मुलींची पहिली पसंत झाली आहे. पिकनिक, आऊटिंग किंवा वीकेंडला जीन्स परिधान करताना दिसत आहेत. पण मीटिंग, कॉन्फरन्स, ऑफिशियल पार्टी किंवा सेमिनारच्या वातावरणात हे फिट बसत नाही. म्हणूनच मुलींनी आता पँट-ट्राऊजरला प्रमुख पोशाखांमध्ये सहभागी केले आहे. त्यातही विविध प्रकार आहेत. - ट्राऊजर, सिक्स पॉकेट, कार्गो, बूट कट आदी.

तुम्ही ऑफिस व्यतिरिक्त टी पार्टी किंवा डिनर पार्टीत सिल्क शर्टसोबत पँट परिधान करू शकता. पँट आरामदायक असल्यामुळे हल्ली मोठ्या इन्स्टिट्यूटनी शर्ट-पँट हा युनिफॉर्म म्हणून स्वीकारला आहे. एअरलाइन्स, हॉस्पिटलच्या व्यतिक्ति काही बँका आणि कॉलेजमध्ये आता मुली युनिफॉर्म म्हणून पँट-शर्ट परिधान करायला लागल्या आहेत. त्याने स्मार्टनेस वाढतोच आणि धावपळीची कामे सोपी होतात. पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसते. तसेच त्यावर बीडसची माळ, डायमंड नेकलेस किंवा नेकपीस, ब्रेसलेट, लेदर बेल्ट, कॉर्पोरेट बॅग्जपासून क्लच आणि पर्स हेही मॅच होते. पँट परिधान केल्यास लेदर शूज, सँडल, ट्रेंडी चप्पलसुद्धा परिधान शकता. त्याचबरोबर आपण पिकनिक आणि खेळण्यासाठी कार्गो किंवा सिंपल बूट कट देखील वापरू शकता.

**पँटसोबत साधारण कॉटन शर्ट असो किंवा सिल्क व जॉर्जेटचे शर्ट अगदी सर्व मॅच करतात. एखाद्या डिनर पार्टीत एक शानदार स्कार्फ किंवा शालसुद्धा पँट-शर्ट सोबत छान दिसतो.**



# वेळ सत्कारणी लावा

**बयापैकी** श्रीमंत असलेल्या कुटुंबाच्या काही सवयी असतात. विशेषतः वृद्ध स्त्रियांना पेपर वाचायचा असतो. सकाळ-संध्याकाळ बाहेर फिरून यायचे असते. ठरावीक पदार्थाचा आस्वाद घ्यायचा असतो. वैयक्तिक अशी त्यांची कामे त्यांना करायची असतात. इतकेच नव्हे; तर आपले आरोग्य उत्तम राहण्यासाठी व्यायामही करायचा असतो. तेवढे पथ्यही त्यांना पाळायचे असते. वेळच्या वेळी औषध घेणे आणि आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी सोबतीला कोणी मदतनीस स्त्री मिळाली तर ती त्यांना हवी असते. ज्यांना अशा सेवेत रूची आहे, त्यांना ही कामे करता येतील.

आई-वडिलांकडे लक्ष देता यावे म्हणून काही मुले-मुली खासगीरीत्या नर्स ठेवत असतात. पण ही नर्स फक्त आरोग्याची देखभाल करते. आपण पुढाकार घेतला तर सोप्या गोष्टी करता येणे शक्य आहे.



# वाढतं वजन थांबवायचंय ?

## मग आहारात करा या घटकांचा समावेश

**बदलत्या जीवनशैलीमुळे वाढतं वजन ही प्रत्येकाची समस्या झाली आहे. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्याचा अनेक जण वेगवेगळ्या पद्धतीने प्रयत्न करत असतात. अनेक वेळा डाएट करूनही वाढलेल्या वजनाला आळा बसत नाही. अशा वेळी आहारामध्ये वजन कमी करण्यास मदत करणाऱ्या पदार्थांचा समावेश करायला हवा. या पदार्थांच्या सेवनामुळे वारंवार लागणाऱ्या भुकेला आळा बसतो.परिणामी वजन लवकर वाढत नाही. असेच काही पदार्थ रुपम सिन्हा यांनी सांगितले आहेत.**

**लाल मिरची**

रोजच्या जेवणाला झणझणीतपणा येण्यासाठी अनेक वेळा गृहिणी भाजी, आमटीमध्ये लाल मिरची किंवा लाल तिखटाचा वापर करतात. मात्र जेवणाची रंगत वाढवणारी लाल मिरची वजन कमी करण्यासाठीदेखील तितकीच उपयोगी आहे. लाल मिरचीमध्ये कॅप्सॅकीन संयुग असतात. कॅप्सॅकीनमुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. परिणामी वाढत्या वजनाला आळा बसतो.

**लसूण**

एखाद्या पदार्थाला खमंग फोडणी द्यायची असेल लसूण गरजेचाच आहे. मात्र लसणाचा उपयोग केवळ जेवणासाठीच होत नसून आजारपणातही होतो. अनेक वेळा आजारपणामध्ये लसणाचा वापर औषध म्हणून केला जातो. त्याप्रमाणेच वजन कमी करण्यासाठीदेखील लसणाचा उपयोग होतो. जेवणामध्ये लसणाचा समावेश असेल तर जेवताना पोट भरलंय ही भावना मस्तिष्कापर्यंत पोहोचवण्याचं काम लसूण करतो. त्यामुळे पोट भरल्यानंतर आपण आपोआप जेवायचं थांबवतो. त्यामुळे आहारात लसणाचा समावेश करायला हवा. त्यासोबतच रक्ताच्या गुठळ्या होण्यापासून लसूण मदत करतो. तर हृदयाचे आरोग्यही नीट राहते.



**लाल आणि हिरवी मिरची**

मसाल्याच्या पदार्थांमधील महत्त्वाचा घटक म्हणजे मिरची. लाल मिरचीप्रमाणेच सुकी लाल मिरची किंवा हिरवी मिरची यांचाही तितकाच शरीराला फायदा होतो. मिरचीमध्ये व्हिटॅमिन ए, सीसोबतच बीटा कॅरोटिन असतं. त्यामुळे योग्य प्रमाणात मिरचीचं सेवन केलं तर पचनक्रिया सुधारते आणि भूक नियंत्रणात राहते.

**दालचिनी**

भूक नियंत्रणात ठेवण्याचं महत्त्वाचं काम दालचिनी करत असते. दालचिनीमुळे शरीरातील अतिरिक्त चरबी कमी होते. त्यासोबतच दालचिनीच्या सेवनामुळे शरीरातील मेटाबोलिज्म वाढविण्यास मदत होते. दालचिनीमुळे धमन्यांचं कार्यही सुधारते आणि शरीरातील वाढलेल्या कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात आणली जाते.

**कोकम (आमसूल)**

आंबट, चटपटीत अशी चव असणाऱ्या कोकमाचे अनेक फायदे आहेत. भूक नियंत्रणात आणण्यासाठी कोकमचा उपयोग करण्यात येतो. त्यामुळे जेवणापूर्वी रोज एक कोकम खावं.

# चव वाढवणाऱ्या चक्रीफुलाचे असेही गुणकारी फायदे

**गरम मसाल्यांसाठी प्रसिद्ध असलेलं राष्ट्र म्हणजे भारत. त्यामुळे प्रत्येक भारतीय व्यक्तीच्या स्वयंपाक घरामध्ये गरम मसाल्याचे पदार्थ हमखास आढळतात. जेवणाची चव वाढवणाऱ्या या पदार्थांपैकी काहींचा वापर आजीबाईच्या बटव्यासाठीही केला जातो. त्यामुळे चवीसोबतच हे पदार्थ गुणकारी असल्याचं दिसून येतं. मसाल्याच्या पदार्थांमध्ये महत्त्वाचा मानला जाणारा घटक म्हणजे चक्रीफूल. चक्रीफूल केवळ मसाल्याची चव वाढवत नसून त्याचे अन्यही काही गुणधर्म आहेत. इशा त्यागी यांनी चक्रीफुलाचे काही गुणधर्म सांगितले आहेत. ते पुढील प्रमाणे**

**वाढत्या वयाची लक्षणे थांबवण्यासाठी**

वय वाढायला लागलं की त्याच्या खुणा चेहऱ्यावर आपोआप दिसू लागतात. त्यामुळे अनेक वेळा तरुणी किंवा महिला प्रसाधनांचा वापर करून वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचा प्रयत्न करतात. मात्र आपल्या आहारात समावेश केलेल्या पदार्थांमुळेदेखील ही समस्या टाळता येऊ शकते. रोजच्या जेवणामध्ये वापरण्यात येणाऱ्या मसाल्यामध्ये चक्रीफूल हे महत्त्वाचं काम करत असतं. चक्रीफूल वाढत्या वयाच्या खुणा लपवण्याचं काम करतं. यामध्ये व्हिटॅमिन 'ए' आणि 'सी'चे प्रमाण मोठ्या प्रमाणावर असते. त्यासोबतच त्यात अँटीऑक्सिडंटचे गुणही असतात. चक्रीफुलामध्ये शरीरातील फ्री रॅडिकल्सला नियंत्रणात आणण्याची क्षमता असते. त्यामुळे वाढत्या वयाची लक्षणं रोखण्याचं काम चक्रीफूल करते.



**सर्दी-खोकल्यावर गुणकारी**

कोणत्याही ऋतूमध्ये होणारा आजार म्हणजे सर्दी आणि खोकला. काही जणांना थंड पदार्थांचं सेवन केल्यानंतर लगेच सर्दी-खोकल्याची समस्या निर्माण होते. अशावेळी चक्रीफूल हे फायदेशीर ठरते. चक्रीफुलामध्ये थाइमो आणि एथोल याचे गुणधर्म असतात. त्यामुळे सर्दी किंवा खोकल्यावर चक्रीफूल गुणकारी आहे. त्यासोबतच शरीरामध्ये उष्णता वाढवण्याचं काम चक्रीफूल करते.

**पचनक्रिया सुधारते**

उशिरा जेवण झाल्यामुळे किंवा एखाद्या वेळी चुकीचे पदार्थ खाल्ल्यामुळे अनेक वेळा अपचन, पोटात गॅस होणे, पोटदुखी या सारख्या समस्या निर्माण होतात. मात्र या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी चक्रीफूल फायदेशीर ठरते. चक्रीफुलामुळे पचनक्रिया सुधारते. त्यामुळे आपल्या आहारात चक्रीफुलाचा समावेश करायला हवा.

# उल्हासनगरात दिवसाढवळ्या नशेखोरांची दहशत!

## बंजारा कॉलनीत तलवारी-चॉपरने नागरिकांवर हल्ला, ३ जण गंभीर

**■उल्हासनगर :** उल्हासनगरात नशेच्या धुंदीत बेशिस्तपणाचे थैमान सोमवारी सकाळपासून पाहायला मिळाले. तलवारी, चॉपर आणि चाकूंनी सज्ज झालेल्या गुन्हेगारी वृत्तीच्या तरुणांच्या टोळक्याने भर रस्त्यावर रक्ताचा खेळ मांडला. महिलांपासून सामान्य नागरिकांपर्यंत कोणालाही न बघता धारदार शस्त्राने हल्ले करत या टोळक्याने परिसरात दहशतीचं वातावरण निर्माण केलं. या प्रकारामुळे 'पोलिस कुठं आहेत?' हा प्रश्न या प्रकाराने गर्भगळित झालेल्या प्रत्येकाच्या ओठांवर आहे.

उल्हासनगर कॅम्प ४ मधील बंजारा कॉलनीत सोमवारी सकाळी घडलेली एक धक्कादायक घटना सध्या शहरात चर्चेचा विषय ठरली आहे. काही नशेखोर तरुणांनी तलवारी, चॉपर आणि चाकूंसह रस्त्यावर उतरत अक्षरशः आतंक माजवला. या हल्ल्यांत तिघे गंभीर जखमी झाले असून महिलांवर हल्ल्याचा प्रयत्न, घरांवर दगडफेक आणि पाळीव प्राण्यांवर देखील अमानुष हल्ला केल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी सकाळी सुमारे ६ वाजता नरेश श्रीवास्तव हे भाजीपाला घेण्यासाठी घराबाहेर पडले असताना या नशेत असलेल्या गुन्हेगारी वृत्तीच्या टोळक्याने त्यांच्यावर अचानक धारदार शस्त्रांनी हल्ला केला. नरेश यांच्या डोक्यावर आणि हातावर घाव घालण्यात आले असून ते सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत.





नंतर थोड्या वेळाने याच टोळक्याने रघुनाथनगर बंजारा कॉलनी परिसरात राफा कुटुंबाच्या घराबाहेर येत त्यांच्या पाळीव कुत्र्यावर क्रूरपणे हल्ला केला. हे पाहून अश्विनी राफा यांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्या दिशेनेही शस्त्र उगारण्यात आले. अश्विनी यांचा भाऊ आणि शेजारी त्यांना वाचवायला धावून आले, परंतु या तरुणांनी त्यांच्यावरही तलवारी, चाकू आणि चॉपरने हल्ला केला. यात दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. हल्लेखोरांनी राफा यांच्या घरावरही चाकू, चॉपर आणि तलवारीने तुफान हल्ला चढवला.

### १०० आणि ११२ वर फोन करूनही मदत नाही...

नागरिकांनी घटना घडल्यानंतर तातडीने पोलिसांची मदत मागण्यासाठी १०० आणि ११२ या आपत्कालीन क्रमांकावर अनेक वेळा कॉल केले. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे या क्रमांकावरून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही असा आरोप राफा कुटूंबीयाने केला आहे. तोपर्यंत आरोपींनी हल्ले करून पळ काढला होता. आपत्कालीन सेवेतील या दुर्लक्षामुळे संतप्त नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ह्यपोलिस मदतीला वेळेवर पोहोचत नसतील, तर अशा सेवा कोणासाठी?ह्व असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# ई-ऑफिस प्रणालीचा नागरिकांना ताप...

## वेळेच्या खोळंब्यामुळे नागरिक आणि कर्मचारी यांच्यात वाद

**■ठाणे :** मोठा गाजावाजा करत ठाणे महापालिकेत सुरू करण्यात आलेल्या ई-ऑफिस प्रणालीचा नागरिकांना भलताच ताप झाला आहे. रांगेत एक दोन तास खोळंबून राहिलेल्या नागरिक आणि कर्मचारी यांच्यामध्ये खटके उडत असून अनेक वेळा वादाला आमंत्रण मिळत आहे. काही नागरिकांनी तर हाच गतिमान कारभार असेल तर जुन्याच प्रणालीनुसार कारभार करा, असा सल्ला देखील पालिका प्रशासनाला दिला आहे.

शासकीय कार्यालयातील दैनंदिन कामकाज सुलभ, पारदर्शक व गतिमान पद्धतीने कामे व्हावीत, यासाठी १ एप्रिलपासून ठाणे महापालिकेत ई-ऑफिस कार्यप्रणालीची सुरुवात करण्यात आली. ही प्रणाली उत्तम असली तरी एखादा अर्ज किंवा निमंत्रण द्यायचे झाल्यास येणाऱ्या नागरिकाला त्यासाठी रांगेत उभे राहून एक ते दीड तासाचा अवधी जात असल्याची बाब समोर आली आहे. त्यातही तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून रोज किती अर्ज करता, आम्हाला काय एकच काम आहेत का? अशा पद्धतीने बोलून नागरिकांशी हुज्जत घालण्याचे काम करीत असल्याची धक्कादायक बाबही समोर आली आहे. त्यामुळे ही कार्यप्रणाली चांगली असली तरी देखील ठाणेकरांना वेळ तर वाया जात आहेच, शिवाय कर्मचाऱ्यांकडून त्यांना बोलणी देखील खावी लागत आहेत.

महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या मिशन शंभर दिवस या उपक्रमातंर्गत ई -ऑफिस कार्यप्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. महापालिकेच्या माध्यमातून राबविले जाणारे प्रकल्प, निंमत्रण, अर्ज करायचे झाले तरी देखील आता या ई -ऑफिसचा पर्याय ठाणे महापालिकेने उपलब्ध करून दिला आहे. तसेच ई -ऑफिस कार्यप्रणालीमुळे कोणत्याही कामाचा प्रस्ताव एक ते दोन दिवसात मार्गी लागण्यास मदत होणार आहे. शिवाय या कामामध्ये सुसूत्रता व पारदर्शकता देखील राहणार आहे. तसेच प्रत्येक प्रस्तावाला ई-नंबर दिला जाणार असून संबंधित प्रस्ताव कोणत्या अधिकाऱ्यांच्या स्तरावर आहे किंवा त्यास विलंब झाला याचे देखील ट्रेकिंग ठेवण्यात येणार आहे. त्यानुसार ठाणेकरांना देखील एखादा अर्ज करायचा झाल्यास त्यासाठी देखील या प्रणालीचा वापर केला जात आहे.

परंतु जेव्हापासून ही प्रणाली कार्यान्वित झाली आहे, तेव्हापासून ठाणेकरांचा वेळ मात्र मुख्यालयात वाढत असल्याचे चित्र आहे. त्यातही एक अर्ज किंवा साधे निमंत्रण जरी द्यायचे झाले तरी देखील त्यासाठी रांगेत एक ते दीड तास उभे रहावे लागत आहे.

दुसरीकडे मनसेचे संतोष निकम हे महापालिका मुख्यालयातील नागरी सुविधा केंद्रात गेले असता, त्यांचा पाऊण तासाहून अधिकचा वेळ रांगेत गेलाच, शिवाय त्यांनी कर्मचाऱ्यांकडून देखील चुकीची वागणूक मिळाली आहे. सारखे अर्ज करून तुम्ही आमचा वेळ वाया घालवत आहात, किती अर्ज करणार आम्हाला काय तेच काम आहे का?, त्यातही संबधींत कर्मचाऱ्याला नाव विचारले असता ते तर सांगितले नाहीच, शिवाय त्याच्या गळ्यात ओळखपत्र देखील नसल्याचे दिसून आले आहे. तसेच यावेळी सुरक्षारक्षांकरवी शारीरिक बळाचा वापर करून धमकावण्याचा प्रयत्न देखील झाल्याची बाब दिसून आली आहे. या संदर्भात त्यांनी अतिरिक्त आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला आहे.



### या ठिकाणी काम करण्यासाठी एकच कर्मचारी

ई -ऑफिस प्रणालीचे काम करण्यासाठी याठिकाणी तीन संगणक, प्रिंटर असले तरी त्याठिकाणी काम करण्यासाठी एकच कर्मचारी असल्याचा दावा यावेळी निकम यांनी केला आहे. त्यामुळे आलेले प्रत्येक पत्र घेऊन ते स्कॅन करून संबधीत विभागाकडे पाठविण्याच्या प्रक्रियेला साधारणपणे पाच ते सात मिनिटांचा कालावधी जात आहे. त्यामुळे रांग देखील वाढत असल्याचे चित्र याठिकाणी दिसून आले आहे.

# नालेसाफसफाई युद्धपातळीवर सुरू

**■विरार :** वसई-विरार महापालिकेने शहरातील नाल्यांची सफाई करण्यासाठी ड्रेन मास्टर ही अत्याधुनिक यंत्रसामुग्री आणली असून त्याद्वारे नाल्यांची साफसफाई करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी पोकलेन मशीन किंवा जेसीबी पोहचू शकत नाही, अशा ठिकाणच्या नाल्यातील गाळ काढण्यासाठी या यंत्राचा वापर केला जात आहे. अशा प्रकारची यंत्रसामुग्री वापरणारी दिल्ली नंतरची वसई-विरार ही दुसरी महानगरपालिका ठरली आहे.

वसई विरार पालिकेकडून शहरातील नाल्याची साफसफाई करण्यात येत आहे. त्यासाठी ९ प्रभागात नालेसफाईचे काम युध्दपातळीवर सुरू आहे. आजपर्यंत एकूण ४५% हून अधिक नालेसफाईचे काम पूर्ण झाले आहे.



नालेसफाई करताना ज्या ठिकाणी पोकलेन यंत्र किंवा जेसीबी पोहचू शकत नाही, अशा ठिकाणी पाण्यातून किंवा दलदलीच्या भागातून गाळ काढण्यासाठी पालिकेने ड्रेन मास्टर या आधुनिक यंत्राचा वापर सुरू केला आहे. तर नाले साफसफाई करण्यासाठी लॉंग बूम 21, शॉर्ट बुक ३१, जेसीबी २०, ड्रेन मास्टर २, डंपर २५, अशा यंत्रांचा समावेश आहे.

ड्रेन मास्टर यंत्रांला उभयचर प्रकारचे यंत्र असे म्हणतात. हे यंत्र पाण्यावर तरंगून तसेच जमिनीवरून किंवा ड्राय नाल्यांमधून गाळ काढण्याचे काम करते. या ड्रेन मास्टर नावाच्या एका यंत्राची किंमत १ लाख ७४ हजार असून पालिकेने १५ व्या वित्त आयोगातून ३ लाख ४८ हजारांची दोन ड्रेन मास्टर यंत्रे विकत घेतली आहे. नाल्यांमधील गाळ यांत्रिक पद्धतीने काढण्यासाठी ड्रेन मास्टर या यंत्राचा वापर करत आहोत. हे यंत्र कॉम्पॅक्ट स्वरूपाचे असून त्यामुळे नाल्यातील गाळ पूर्णपणे काढून टाकला जात आहे. दलदलीच्या भागात व जास्त पाण्याचा ठिकाणी हे यंत्र चेन स्प्रॅकेटने सहज काम करत आहे.

सध्या नालेसफाईचे काम जोरात सुरू असून या यंत्रांच्या माध्यमातून नालेसफाई अधिक परिणामकारक होत आहे, अशी माहिती पालिकेचे उपायुक्त (घनकचरा) नानासाहेब कामठे यांनी दिली. दिल्ली महापालिकेत या ड्रेन मास्टर यंत्राचा वापर करून नालेसफाई केली जात आहे. दिल्ली नंतर अशा यंत्राचा वापर करणारी वसई विरार ही दुसरी महापालिका ठरली आहे.

ड्रेन मास्टर यंत्रांला उभयचर प्रकारचे यंत्र असे म्हणतात. हे यंत्र पाण्यावर तरंगून तसेच जमिनीवरून किंवा ड्राय नाल्यांमधून गाळ काढण्याचे काम करते. या यंत्रामध्ये गाळ गोळा करण्यासाठी विशेष प्रकारची बीन्स यंत्रावरच उपलब्ध करून दिलेली आहेत, यामुळे ज्या नाल्यांच्या धक्क्यावर इमारती आणि घरे आहेत अशा ठिकाणी नाले साफ करणे खूप शक्य झाले आहे. या यंत्रामुळे हायड्रॉलिक लेग आणि काही गाळ वाहत्या पाण्यात अडकल्यामुळे, यंत्र पाण्यात स्थिर करून ते काढले जात आहे.

# अवकाळीचा कुंभार व्यावसायिकांना फटका



**■भिवंडी :** ठाणे जिल्ह्यात मार्च ते मे हे तीन महिने कुंभारांकडून पिण्याच्या पाण्याचे माठ उत्पादन आणि विक्री करण्याचा व्यवसायिक हंगाम असतो. मात्र गेल्या काही दिवसांपासून ऐन मे महिन्यात पाऊस सुरु असल्याने त्याचा परिणाम कुंभार व्यवसायावर झाला आहे. भिवंडीत तेलगू समाज मोठ्या संख्येने असल्याने चैत्र पाडव्याच्या दिवशी दरवर्षी नवीन माठाची पूजा करून त्यामधील पाणी पिण्यास सुरुवात करतात. या दिवशी हजारोंच्या संख्येने मठाची विक्री होते. त्यामुळे भिवंडीच्या दृष्टीने उन्हाळ्याचे माठ विक्री करण्याची सुरुवात या दिवसांपासून सुरु होते. घरगुती वापराकरिता शहरातील कुटुंबे उन्हाळ्यात थंड पाणी पिण्यासाठी माठ विकत घेतात. त्याच प्रमाणे भिवंडीत सुरु असलेल्या विविध व्यवसायाच्या आस्थापनेत कामगारांना पाणी पिण्यासाठी ठिकठिकाणी माठ अथवा मोठी रांजण विकत आणतात. यंत्रमाग कारखाने, डाईंग,सायझिंग,गोदामे आदी मध्ये लाखोंच्या संख्येने कामगार काम करीत असल्याने शहरात माठ आणि रांजणे मिळून लाखाच्या संख्येने विक्री होते. एप्रिल आणि मे या दोन महिन्यात माठाची विक्री मोठ्या संख्येने असल्याने शहरातील व्यावसायिकांनी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी माठाचा साठा करून ठेवला होता. पावसाळा सुरु झाल्याने त्यांचे माठाचे ग्राहक कमी झाले तर पाऊस झाल्याने भट्टी लावता येत नसल्याने ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात माठ बनविण्याचे बंद झाले. त्यामुळे उत्पादन करणारे आणि विक्री करणाया कुंभारांना या पावसाचा मोठा फटका बसला आहे.

# बदलत्या हवामानामुळे ठाणेकर सर्दी, खोकल्याने बेजार

## खासगी दवाखान्यात रुग्णांच्या संख्येत वाढ

**■ठाणे :** दोन दिवस सतत पडलेल्या अवकाळी पावसामुळे वातावरणात लक्षणीय बदल झाला असून बदलत्या हवामानामुळे ठाणेकर खोकला आणि सर्दीने बेजार झाले आहेत.




काही दिवसांपासून वातावरणात होत असलेल्या बदलाचा, नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिसत आहे. महापालिकेच्या आरोग्य केंद्रासह खाजगी दवाखान्यांमध्ये थंडी तापासह, सर्दी, खोकलाच्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. त्यात खोकला आजार हा औषध उपचार करून देखील लवकर बरा होत नसल्यामुळे रुग्ण या आजारांनी बेजार झाले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात होत असलेले बदल, कधी थंडी तर, कधी कडक उन्ह तर, कधी पाऊस याचा फटका नागरिकांच्या आरोग्याला बसत आहे. सर्दी, खोकला आणि अंगदुखीने नागरिक त्रस्त झाल्याचे दिसत आहे. अनेकजण यावर घरच्या घरी उपचार घेत आहेत. तर, काहीजण घराजवळील दवाखान्यात किंवा शासकीय आरोग्य केंद्रांवर उपचारासाठी गर्दी करत आहेत. यामध्ये बहुतांश रुग्ण हे सर्दी, खोकला आणि अंगदुखीने त्रासलेले आहेत. तर, दुसरीकडे अवकळी पाऊस, उन्ह, वाटवरणात याचं निर्माण होणार गारवा यांमुळे उद्भवणाऱ्या साथरोगांचा सामना करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे.

तसेच मलेरिया या आजारचे मागील वर्षी महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून जानेवारी २०२४ आणि मे २०२४ या चार महिन्याच्या कालावधीत ५२ हजार १२७ रक्ताचे नमुणे गोळा केले होते. त्यात ६५ जणांना मलेरियाची लागण झाली होती. तर, यंदा याच काळात ८२ हजार ६३३ रक्ताचे नमुणे गोळा केले असून त्यापैकी ८९ जणांना लागण झाली होती.

दरम्यान, ठाणे पलिका क्षेत्रात जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२५ या कालावधीत टायफाईडचे, हगवणचे, डायरेयाचे, स्वाईन फ्लुचे, लेप्टोचे, क्वॉलर आणि स्वाईन फ्लुचा एकही रुग्ण आढळून आला नसल्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाकडून देण्यात आलेल्या आकडेवारी वरुण समोर आली आहे. त्यामुळे ठाणे पालिका क्षेत्रात सर्दी, खोकला आणि अंगदुखीने ताप झाला असला तरी, दुसरीकडे मात्र, साथरोग आटोक्यात आल्याचे दिसून येत आहे.

# सिडकोत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांसाठी पैशांची मागणी?

## व्हॉट्सअॅप मेसेजमुळे खळबळ, व्यवस्थापनाकडून चौकशी सुरू

**■नवी मुंबई :** सिडकोतील मलईदार विभागात बदलीसाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून प्रत्येकी दोन ते अडीच लाख रुपयांची मागणी केली जात असल्याचा मेसेज सिडकोतील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर व्हायरल झाल्यामुळे सिडकोतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या वादात सापडल्या आहेत. या व्हायरल मेसेजमध्ये पैसे घेणाऱ्या अथवा देणाऱ्या व्यक्तीचे नाव नसले तरी देखील या मेसेजची व्यवस्थापनाने दखल घेतली असून चौकशी केली जात असल्याचे सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक-१ राजा दयानिधी यांनी सांगितले.




एकीकडे नवी मुंबई महापालिकेत कनिष्ठ अभियंत्यांच्या पदोन्नतीत पैसे घेतल्याचा मेसेज सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर आता सिडकोतील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्यांमध्ये देखील पैशांची डिमांड केली जात असल्याचा मेसेज व्हायरल झाला आहे. विशेष म्हणजे साडेबारा टक्के योजना विभागात काम करणाऱ्या एका कार्यालयीन सहाय्यकाद्वारे कंत्राटी कर्मचाऱ्यांकडे फोन करून पैशांची डिमांड केली जात असल्याचा मेसेज सिडको अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या व्हॉट्सअॅप ग्रुपवर फिरू लागल्याने सिडको वतुर्ळात कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बदल्या चर्चेचा विषय झाला आहे. दरम्यान, या व्हायरल मेसेजबाबत सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी यांच्याकडे देखील काही कर्मचाऱ्यांनी तक्रार नमूद केली आहे. त्यामुळे दक्षता विभागाकडून देखील या व्हायरल मेसेजप्रकरणी चौकशी सुरू झाली आहे.

मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी देखील याबाबत तपास सुरू असल्याचे नमूद केले. तसेच असे प्रकार खपवून घेतले जाणार नसून अधिकारी- कर्मचाऱ्यांच्या बदल्या अथवा पदोन्नती या पारदर्शक व नियमानुसारच केल्या जातील. त्याकरिता कोणीही पैशांची डिमांड करत असल्यास त्याबाबत तत्काळ व्यवस्थापनाला संपर्क साधण्याचे आवाहन राजा दयानिधी यांनी केले आहे.

दरम्यान, अशा प्रकारच्या कुठल्याही मेसेजला कर्मचाऱ्यांनी बळी न पडता ज्या कर्मचाऱ्यांकडे अशा प्रकारची डिमांड कोणी केली असेल तर त्यांनी थेट आपल्याशी संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. काही दिवसांपूर्वी नवी मुंबई महापालिकेतील १२ कनिष्ठ अभियंत्यांना देण्यात आलेल्या पदोन्नतीत पैसे घेतल्याचा आरोप प्रशासनावर करण्यात आला होता. सदर आरोपाची चौकशी करण्यासाठी महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी कनिष्ठ अभियंत्यांच्या पदोन्नतीला स्थगिती देत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांची या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती गठित केली होती.

# रायगड जिल्ह्यात मधमाशांच्या हल्ल्यात ४० हून अधिक ग्रामस्थ जखमी

**■अलिबाग :** रायगड जिल्ह्यात पुन्हा एकदा मधमाशांनी हल्ला केल्याचा प्रकार घडला आहे. यावेळी मधमाशांच्या हल्ल्यात ४२ ग्रामस्थ जखमी झाले आहेत. गंभीर बाब म्हणजे यात १३ बालकांचा समावेश आहे. कोळवटमध्ये ग्रामदेवतेची आरती सुरू असताना सोमवारी (१२ मे) ही घटना घडली. जखमींवर म्हसळा आणि माणगाव येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

म्हसळा तालुक्यातील कोळवट गावात सोमवारी सकाळी ९ वाजता ग्रामदेवतेची आरती सुरू होती. ग्रामस्थ आणि मुंबईकर गावदेवाच्या मंदिरात आरतीसाठी आले होते. अचानक मधमाशांनी ग्रामस्थांवर हल्ला केला. या हल्ल्यामुळे ग्रामस्थ घाबरून पळू लागले. मधमाशांच्या डंखाने



अनेक ग्रामस्थ जखमी झाले. सर्व जखमींना तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. यातील दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. मशमाशांच्या हल्ल्याची माहिती मिळाल्यानंतर सर्व जखमीना तातडीने १०८ रुग्णावाहिकेतून म्हसळा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. म्हसळा ग्रामीण रुग्णालय आणि म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर तसेच कर्मचाऱ्यांनी शिवाय १०८ रुग्णवाहिकेकडून तत्परता दाखवल्याने ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# पेणच्या मोसिनला देशविरोधी मेसेज टाक्यासाठी अटक

**■अलिबाग :** देशविरोधी मेसेज सोशल मीडियावर टाकून दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पेणमधील मोसिन मुजावर याला सोमवारी (१२ मे) पहाटे नवी मुंबईतून अटक करण्यात आली. मोसिन मुजावरला तुर्भे रेल्वे स्टेशनमधून ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पेण पोलिसांनी दिली. पेण पोलीस उपविभागीय अधिकारी गजानन टोंपे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलिस ठाण्यांच्या पथकाने तांत्रिक तपास करत मोसिनचा शोध घेतला.



पेणमधील मोसिन मुजावर या तरुणाने 3 एप्रिल रोजी दुपारी पावणेबाराच्या सुमारास भारताविरोधी चिथावणीखोर पोस्ट केली. सोशल मीडियावर ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर आयुष किरण शहा, पेण यांनी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष साईराज कदम यांच्याशी चर्चा करून ९ मे रोजी पेण पोलिसांकडे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी त्याची सोशल मीडियावरील पोस्टची खात्री केल्यानंतर मोसिनविरोधात गुन्हा दाखल केला.

मोसिनने त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन फियार्दी आयुष शहाला पोस्ट पाठवली. ह्यइंडिया के रुल्स की तहेस नहेस हो गई है, संभलके रहो हमारे पास तो तलवारे, बॉम्ब, मिसाईल सब रेडी है, देख रहा है ना इराण सब लेके बैठा है! जो भी मुस्लिम को तकलीफ देगा एक मिनिट मे उडा देगा वो, एक दिन इंडिया भी हमारा होगा, पुरा कब्जा हमारा होगा, और हम मस्त दबा के मारेंगेह्व असे चिथावणीखोर आणि चुकीची माहिती फियार्दी आयुष शहा यांना देवून त्यांच्या मनामध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

भारत-पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती असताना मोसिन मुजावर याने दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मोसिन पेणचा असला तरी मुंबईला राहतो आणि त्याचे वडील अरब देशात नोकरी करतात. मोसिनच्या पोस्टनंतर पेण तालुक्यासह रायगडमध्ये खळबळ उडाली होती. त्यानंतर ९ मे रोजी रात्री पावणे अकराच्या सुमारास त्याच्यावर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# वसईच्या दांम्पत्यावर फिलीपिन्समध्ये काळाचा घाला

## बाईकवरुन फिरताना ट्रकने उडवले

**■पालघर :** पर्यटनासाठी फिलीपिन्सला गेलेल्या पालघर जिल्ह्यातील वसईमधील एका दाम्पत्याचा दुदैर्वी अपघातात मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. स्थानिक चर्चच्या अधिकाऱ्यांनी मंगळवारी ही माहिती दिली. त्यांच्या पश्चात एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे.

सविस्तर माहितीनुसार, ते वसईतील सँडोर परिसरात वास्तव्यास होते.जेराल्ड परेरा (५०) आणि त्यांची पत्नी प्रिया (४६) हे १० मे रोजी फिलीपिन्समधील सेबू प्रांतातील बाडियान या पर्यटनस्थळी भाड्याने घेतलेल्या दुचाकीवरून फिरत होते. दरम्यान, एका फिलीपिन्स नागरिकाने बेदरकारपणे टोयोटा हिलक्स ट्रकने ओव्हरटेक करताना



त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर दोघेही रस्त्यालगतच्या सिमेंटच्या विद्युत खांबावर आदळले.

या भीषण अपघातात प्रिया यांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी झालेल्या जेराल्ड यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला. परेरा दाम्पत्याचे मृतदेह भारतात आणण्याची प्रक्रिया सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००01४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com